RNI NO. MAHMAR/2020/84035

कायदेविषयक मार्गदर्शन मोफत




संपर्क
ॲड. सुशीला
मो नं 8766507294

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

दि. 20 मे 2026



१९५१- महाबोधी सोसायटी, नवी दिल्ली यांच्या बुद्ध जयंती कार्यक्रमात डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे भाषण.
१९५६- व्हाईस ऑफ अमेरिका मध्ये संवाद भारतातील लोकशाहीचे भवितव्य, यावर भाषण.

संकलन प्रा. यशवंत दुपटे

बुधवार, 20 मे २०२६ | वर्ष : ६ | अंक : १४० | दैनिक | किंमत : ₹५/-

Wednesday, 20 May 2026 | Year : 6 | Issue : 140 | Daily | Rate: Rs. 5/-

## महत्वाच्या बातम्या

### आरबीआयची राज्यातील आणखी एका सहकारी बँकेवर मोठी कारवाई




**मुंबई :** नागरी सहकारी बँक क्षेत्रासाठी धक्कादायक आणखी एक प्रकरण पटलावर आले असून, रिझर्व्ह बँकेने आठवडाभरातील राज्यातील आणखी एका बँकेचा परवाना रद्द करणारी कारवाई केली आहे. गेली काही वर्षे घोटाळा प्रकरणी कराडमध्ये बहुचर्चित असलेल्या यशवंत सहकारी बँकेला अखेर कायमची गुंडाळण्याचा आदेश रिझर्व्ह बँकेने सोमवारी सायंकाळी दिला. आठवडाभरापूर्वीच मुंबईतील सर्वोदय को-ऑपरेटिव्ह बँकेचा परवाना रद्द करणारी कारवाई रिझर्व्ह बँकेने केली आहे. आता मंगळवारपासून (१९ मे) यशवंत बँकेचे सर्व बँकिंग व्यवहार बंद झाले. यानंतर ग्राहकांना बँकेत पैसे जमा करणे किंवा काढणे शक्य होणार नाही. मागील वर्षभरापासून, मे २०२५ पासून बँक रिझर्व्ह बँकेच्या निर्बंधांखाली असल्याने, खात्यातून पैसे काढण्यावर कठोर बंधने होती. बँकेतील घोटाळ्यामुळे सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली होती. यासंबंधी तपास यंत्रणांकडून चौकशी सुरू आहे. या घोटाळ्यातील आरोपी बँकेचे संचालक आणि सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर यांना पोलिसांनी अटक केली आहे. काही काळापासून ते फरार होते.

### गडचिरोलीमध्ये शेतकरी आंदोलन चिघळण्याची शक्यता...

**गडचिरोली :** जिल्ह्यातील सुपीक शेतजमिनी वाचविण्यासाठी सोमवारी हजारो शेतकऱ्यांनी एकत्र येत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन केले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी चामोर्शी तालुक्यातील तब्बल १३ गावांतील १६०४ हेक्टर खासगी जमीन संपादन प्रक्रियेला प्रशासनाने गती दिल्याचे समोर आले आहे. त्यामुळे चामोशी तालुक्यावरील भूसंपादनाचे संकट अधिक गडद झाले असून शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त केला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातून जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) चामोर्शी औद्योगिक क्षेत्र टप्पा-५ अंतर्गत लॉयड मेटल्स अँड एनर्जी लिमिटेडच्या 'इंटिग्रेटेड स्टील प्लांट'साठी चामोर्शी तालुक्यातील चित्रंजनपूर, किष्टापूर, चेनपूर, दुर्गापूर, सलूर, लक्ष्मीपूर, गणपूर रे., विहीरपूर, मुधोली तुकूम, जयरामपूर, बामणीपीठ, यादवपल्ली आणि पारडीदेव या गावांतील जमीन संपादित करण्याची प्रक्रिया पुढे नेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकल्पासाठी १६०४.६२ हेक्टर खासगी आणि १०१.१० हेक्टर शासकीय जमीन प्रस्तावित आहे.

### अणु अपघातांच्या भरपाईवर मर्यादा: 'शांती कायद्या'वर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी



**नवी दिल्ली :** देशातील अणुऊर्जा प्रकल्पांमध्ये कोणतीही अनुचित घटना घडल्यास नुकसान भरपाईची कमाल मर्यादा ३,००० कोटी रुपये निश्चित करणाऱ्या २०२५ च्या नवीन कायद्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. याचिकेवर सुनावणी करताना, सर्वोच्च न्यायालयाने याला अत्यंत संवेदनशील कायदेविषयक धोरणात्मक मुद्दा म्हटले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांचा समावेश असलेल्या खंडपीठाने या प्रकरणी चिंता व्यक्त केली. सर्वोच्च न्यायालयाने असे मत व्यक्त केले की, 'भारताच्या परिवर्तनासाठी अणुऊर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती' शांतता कायदा, २०२५ च्या विविध तरतुदींना आव्हान देणारी ही याचिका देशाच्या आर्थिक धोरणाशी थेट संबंधित आहे. चर्चेदरम्यान, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने व्यावहारिक बाबींवर भाष्य केले. सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, अणुऊर्जा तंत्रज्ञान आयात करणे आवश्यक आहे. दायित्वावर मर्यादा नसल्यास, भारतात काम करण्यासाठी कोण पुढे येईल? न्यायालयाने असा विश्वासही व्यक्त केला की, अशी एखादी अनुचित घटना घडल्यास, राज्य सरकार पीडितांना नुकसान भरपाई देईल.

# NEET पाठोपाठ MHT-CET परीक्षेतही गैरप्रकार ?




**नवी दिल्ली :** देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणानंतर आता महाराष्ट्रातील एमएच-सीईटी प्रवेश परीक्षेतही मोठा गैरप्रकार झाल्याचा संशय काँग्रेसने व्यक्त केला. ₹इयत्ता १२ वीच्या परीक्षेत अवघे ३७ टक्के मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याला सीईटी परीक्षेत थेट ९९ पर्सेन्टाईल गुण कसे काय मिळू शकतात? असा सवाल काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी उपस्थित केला. मुंबईत आयोजित एका पत्रकार परिषदेत त्यांनी याचे काही धक्कादायक पुरावे सादर केले. पत्रकारांशी बोलतांना सचिन सावंत यांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या कारभारावर गंभीर बोट ठेवले. ते म्हणाले की, ₹इयत्ता १० वी आणि १२ वीच्या परीक्षेत अवघे ४० किंवा ४५ टक्के गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना एमएच-सीईटी परीक्षेत १०० टक्के गुण मिळाले आहेत. अशा संशयास्पद विद्यार्थ्यांची संपूर्ण यादीच आम्ही पुराव्यासाहित जाहीर केली आहे. हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी जोडलेला अत्यंत गंभीर मुद्दा आहे.₹ अभियांत्रिकी आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या या




प्रवेश परीक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना सावंत यांनी महत्त्वाचा मुद्दा मांडला. ₹बारावीची बोर्ड परीक्षा आणि एमएच-सीईटी या दोन्ही परीक्षांचा अभ्यासक्रम समान असतो. एमएच-सीईटीसाठी तर अकरावी आणि बारावी अशा दोन्ही वर्षांचा कसून अभ्यास करावा लागतो. जो विद्यार्थी दोन वर्षे सलग अभ्यास करतो, त्याला मुख्य बोर्ड परीक्षेत अत्यंत कमी गुण मिळतात आणि सीईटीमध्ये मात्र तो थेट १०० टक्के गुण खेचून आणतो, हे अनाकलनीय आहे, असे सावंत म्हणाले. सचिन सावंत यांनी या प्रकरणाबाबत सोशल मीडियाच्या माध्यमातून आवाज उठवला. मात्र, त्यावर राज्य सीईटी सेलने दिलेले स्पष्टीकरण अत्यंत बेजबाबदारपणाचे होते, असा आरोपही त्यांनी केला.

### मोटेगावकर सरांच्या ट्युशनमधील घरी पोहचले पोलीस आणि...

नागपूर : देशभरात खळबळ उडालेल्या नीट पेपरफुटी प्रकरणात महाराष्ट्रात मोठी कारवाई करण्यात आली. लातूरमधील एका प्रसिद्ध क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) अटक केली. मोटेगावकर यांना १८ मे) पुण्यातून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने अटक केली. त्यानंतर त्यांना दिल्लीतील न्यायालयात हजर करण्यात आले. केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) दिल्ली येथील विशेष पथकाने मंगळवारी नागपूर आणि चंद्रपूर येथे मोटेगावर सरांच्या तीन विद्यार्थ्यांच्या घरांवर झडती कारवाई केली. थेट विद्यार्थ्यांची चौकशी होत असल्याने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, झडती घेण्यात आलेल्या तिघांपैकी दोन विद्यार्थी नागपूरमधील असून एक उमेदवार चंद्रपूर जिल्ह्यातील आहे. सीबीआयच्या पथकांनी या विद्यार्थ्यांच्या घरांची व मोबाईलची तपासणी केली. या विद्यार्थ्यांचे नीट परीक्षेदरम्यान काही संशयास्पद संपर्क, आर्थिक व्यवहार आणि परीक्षा प्रक्रियेशी संबंधित डिजिटल पुरावे तपासण्याच्या उद्देशाने ही कारवाई करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी संबंधित विद्यार्थ्यांच्या निवासस्थानी लॅपटॉप, मोबाईल फोन, काही दस्तऐवज तसेच ऑनलाईन व्यवहारांची माहिती तपासली. पास पथकाने विद्यार्थ्यांच्या पालकांशी तसेच काही परिचितांशीही चौकशी केल्याचे समजते. पेपरफूट रॅकेटशी संबंधित दलाल, कोचिंग नेटवर्क किंवा आर्थिक देवाणघेवाणीचा काही संबंध आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती आहे. काही इलेक्ट्रॉनिक उपकरणे तपासासाठी जप्त करण्यात आल्याचीही माहिती पुढे येत आहे. मात्र अधिकृतरीत्या याबाबत कोणतीही पुष्टी करण्यात आलेली नाही. अद्यापपर्यंत कुणालाही ताब्यात घेण्यात आलेले नाही. मात्र पुढील चौकशीसाठी कुणाला अटक करायची की नाही याचा निर्णय दिल्लीचे पथक घेणार आहे. २०१५ मधील एआयपीएमटीतील घोटाळा व २०२१ मधील 'नीट'च्या महाघोटाळयात नागपुरचा थेट सहभाग होता व मास्टरमाईंड परिमल कोतपल्लीवार नागपुरातच आरएस एज्युकेशन नावाची संस्था चालवत होता व त्याने देशपातळीवर डमी उमेदवारांचे रॅकेट चालविले होते हे विशेष.

## आंदोलन करा, पण रस्ते अडवून त्रास देऊ नका : सरन्यायाधीश

**नवी दिल्ली :** लोकशाहीत प्रत्येक नागरिकाला कायद्याच्या चौकटीत राहून आणि शांततापूर्ण मार्गाने विरोध प्रदर्शन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मात्र, रस्त्यावर उतरून सामान्य जनतेसाठी अडचण निर्माण करण्याची किंवा कायदा-सुव्यवस्था बिघडून भीतीचे वातावरण तयार करण्याची परवानगी कोणालाही दिली जाऊ शकत नाही, असे स्पष्ट मत देशाचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी मंगळवारी व्यक्त केले.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नाव लोकनेते डी.बी. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ ठेवण्याच्या मागणीसाठी आणि केंद्र सरकारने यावर तातडीने निर्णय घ्यावा, यासाठी प्रकाशज्योत सामाजिक संस्था यांनी सुप्रीम कोर्टात याचिका दाखल केली होती. या याचिकेवरील सुनावणी दरम्यान कोर्टाने सामान्यांना त्रास न देताना आंदोलन करण्याचा सल्ला दिला. मात्र, हा विषय सरकारच्या निर्णयाशी संबंधित असल्याचे सांगत सुप्रीम कोर्टाने या याचिकेत हस्तक्षेप करण्यास स्पष्ट नकार दिला. 'विमानतळाचे नाव काय असावे, हे ठरवणे कोर्टाचे काम नाही'



मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठासमोर ही सुनावणी पार पडली. याचिकाकर्त्यांने मुंबई उच्च न्यायालयाच्या नोव्हेंबर २०२५ मधील आदेशाला सुप्रीम कोर्टात आव्हान दिले होते. उच्च न्यायालयाने हीच मागणी करणारी याचिका फेटाळली होती.

सुनावणीदरम्यान खंडपीठाने याचिकाकर्त्याला सांगितले की, हा पूर्णपणे धोरणात्मक निर्णय आहे. कोणत्याही विमानतळाचे नाव काय असावे, हे ठरवणे न्यायालयाचे काम आहे का? राज्य सरकारला या प्रकरणात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करू द्या.

## आगीच्या विळख्यात येऊन शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू



**साकोली (भंडारा) :** साकोली शहराला लागून असलेल्या लाखांदूर रोड परिसरातील मक्याच्या शेताला आग लागली. डोळ्यादेखत पिक जळतांना पाहून शेतकरी आग विझवायला धावला. मात्र त्या आगीत सापडल्याने शेतकऱ्याचा होरपळून मृत्यू झाला. रामदास गोखलू निंबेकर (६५, तलाव वॉर्ड, साकोली) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून ही हृदयद्रावक घटना मंगळवार, १९ मे रोजी सकाळी १०:२५ वाजताच्या सुमारास घडली. रामदास निंबेकर यांचे शेत रस्त्यालगत आहे. शेतामध्ये त्यांनी मक्याचे पिक लावले होते. परिपक्व झालेले पिक सुकण्याच्या बेतात असतानाच अचानकपणे शेताला आग लागली. संपूर्ण पिकच आगीत जळायला लागले. हे पाहून त्यांनी पिक वाचविण्यासाठी धाव घेतली. मात्र आगीने रौद्ररूप धारण केल्याने ते आगीच्या विळख्यात सापडले. यात त्यांचा होरपळून अंत झाला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. आगीमधून त्यांना बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करण्यात आले, मात्र आग मोठ्या प्रमाणात पसरल्याने नागरिकांचे प्रयत्न

## पेट्रोल-डिझेल आणखी भडकणार?




**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या तणावाने जगातील सर्वच देशांचे आर्थिक गणित कोलमडले आहे. यातच भारतातही तेल कंपन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात पुन्हा एकदा वाढ केली आहे. आठवड्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजेच, मंगळवारी पेट्रोल-डिझेलचे दर प्रतिलिटर सुमारे ९० पैशांनी वाढले आहेत. विशेष म्हणजे आठवड्याच्या आतच हे दर दुसऱ्यंदा वधारले आहेत. मात्र, कोटक इनस्टिट्यूशनल इक्विटीज' या ब्रोकरेज फर्मच्या मते, ₹सध्याच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी हे उपाय पुरेसे नाहीत. ब्रोकरेजच्या मते, या दरवाढीने तेल विपणन कंपन्यांना (OMCs) होत असलेले नुकसान भरून निघणार नाही. हा तोटा पूर्णपणे भरून काढण्यासाठी पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत आणखी १३ ते १७ रुपये प्रतिलिटर एवढी वाढ केली जाऊ शकते. सध्या सरकारी तेल कंपन्यांना दरमहा सुमारे २५,००० कोटी रुपयांचा तोटा होत आहे. तोट्याचा विचार करता, डिझेलवर प्रतिलिटर ११.४० रुपये तर पेट्रोलवर १४.३० रुपये अंडर-रिकव्हरी आहे. सरकारने सोन्यावरील आयात शुल्क ६ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढवले असले, तरी दीर्घकाळात ते प्रभावी ठरणार नाही, यामुळे देशांतर्गत बाजारात सोन्याचे दर वाढले आहेत. लोकांकडील सोन्याचे एकूण मूल्यही वाढले आहे. यामुळे सोन्यावर जीएसटी (GST) वाढवणे अधिक प्रभावी ठरले असते, असे कोटकचे मत आहे. याशिवाय, आर्थिक वर्ष २०२७ मध्ये भारताचा जीडीपी विकास दर ६% आणि सरासरी महागाई दर ५% राहण्याची शक्यता कोटकने वर्तवली आहे.

## काही झाले तरी अमेरिकेला शरण जाणार नाही : इराण

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष कमी होताना पाहायला मिळत नाही. होर्मुझची सामुद्रधुनी नियंत्रणावरूनही तणाव कामी होताना दिसत नाही. एकीकडे चर्चेच्या फेऱ्या सुरू असल्या तरी दुसरीकडे यातून मार्ग निघत नाही. यातच इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना सडेतोड प्रत्युत्तर दिले आहे. काही झाले तरी इराण हा अमेरिकेला शरण जाणार नाही, असे स्पष्ट केले. इराणच्या राष्ट्राध्यक्षांनी म्हटले आहे की, अमेरिकेसोबतच्या चर्चेदरम्यान 'शरणागती पत्करण्याचा' इराणचा कोणताही इरादा नाही. चर्चेचा अर्थ शरणागती नव्हे. इराण पूर्ण सन्मान, अधिकार आणि देशाच्या हक्कांचे संरक्षण करत चर्चेत उतरला आहे. कोणत्याही परिस्थितीत इराण आपल्या लोकांच्या आणि देशाच्या कायदेशीर हक्कांपासून मागे हटणार नाही, असे त्यांनी नमूद केले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी एक विधान केले होते की, कतार, सौदी अरेबिया आणि यूएईच्या सर्वोच्च नेत्यांच्या विनंतीवरून इराणवरील लष्करी हल्ला सध्यापुरता थांबवण्यात आला आहे. कराराबाबत सध्या गंभीर चर्चा सुरू आहे, परंतु जर कोणताही करार झाला नाही, तर अमेरिका लष्करी कारवाईसाठी पूर्णपणे तयार असेल, असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. दरम्यान, इराणसाठी वेळ संपत आला आहे आणि त्यांना त्वरीत हालचाल करावी लागेल, नाहीतर त्यांच्या हाती काहीच उरणार नाही. वेळ अमूल्य आहे, असे सूचक संकेत ट्रम्प यांनी दिले. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी मध्य पूर्वेतील तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्करी कारवाईचे संकेत दिले होते.

मंगल परिणय वर्धापनदिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

20 may 2026



आंबेडकर चळवळीतील सामाजिक आणि सहकार क्षेत्रातील अग्रणी व्यक्तिमत्त्व, हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड आणि नागार्जुन हाऊसिंग सोसायटी चे संस्थापक अध्यक्ष बाबु हरदास एल. एन. बहुउद्देशीय संस्था चे उपाध्यक्ष, आटो टेलिकॉम कर्मचारी पत संस्था चे मागील साडेचार दशके सहकार विषयक सल्लागार म्हणून कार्यरत सन्माननीय **कृष्णराव बाबुराव मंडपे** आणि त्यांच्या सहचारीणी **प्रतिभाताई कृष्णराव मंडपे** यांच्या कुटुंब संस्था रुपी प्रवासाचे **अर्ध शतक** पूर्ण झाले आहे या निमित्ताने **मंगल परिणय सालगिरह गौरवणिय अभिनंदन!**

मंगल कामना

**शुभेच्छुक :** हरदास नगर अर्बन क्रेडिट को. ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड आणि नागार्जुन हाऊसिंग सोसायटी बाबु हरदास एल.एन. बहुउद्देशीय संस्था-सर्व पदाधिकारी, संचालक सदस्य, कर्मचारी अभिकर्ता आणि मित्र परिवार

## नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

**पुणे :** नसरापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याच्याविरुद्ध चौदा दिवसात आरोपपत्र दाखल करण्यात आल्यानंतर आता या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहेत. या प्रकरणाची सुनावणी येत्या २१ मेपासून पुण्यातील विशेष न्यायालयात दररोज होणार आहे.

महाराष्ट्र दिनी भोर तालुक्यातील नसरापूर परिसरात साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्यचाार करुन तिचा खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. या घटनेचे संतप्त पडसाद पुणे शहर, तसेच राज्यात उमटले होते. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास करुन भीमराव कांबळे (वय ६५) याला अटक केली. गुन्हा घडल्यानंतर पोलिसंनी सखोल तपास करुन आरोपी कांबळे याच्याविरुद्ध विशेष न्यायालयात ११०० पानी आरोपपत्र दाखल केले. आरोपपत्र न्यायवैद्यक अहवाल, सीसीटीव्ही चित्रीकरण, तांत्रिक पुरावे, तसेच शवविच्छेदन अहवाल,



प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब जोडण्यात आले आहेत. नसरापूर अत्याचार प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेऊन आरोपीला कठोर शिक्षा करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते. खटला जलदगतीने चालविण्यात येणार आहे.' अशी माहिती विशेष सरकारी वकील अजय मिसर यांनी दिली. या प्रकरणात ॲड. मिसर यांना ॲड. सुरेश गायकवाड, ॲड. प्रमेश शिगणे हे सहाय करणार आहेत. ॲड. मिसर हे २००० पासून सरकारी वकील म्हणून काम पाहत आहेत. विविध गंभीर गुह्यांच्या खटल्यात त्यांनी सरकारी वकील म्हणून काम पाहिले आहे.

नसरापूर अत्याचार प्रकरणाची सुनावणी दररोज होणार आहे. ही सुनावणी बंद खोलीआड (इन कॅमेरा) होणार आहे. पीडित बालिकेच्या कुटुंबीयांची ओळख न पटू देणे, तसेच संवेदनशील बाबी विचारात घेऊन न्यायालयाकडून आवश्यक ती काळजी घेण्यात येणार आहे. आरोपीला दररोज कडक बंदोबस्तात न्यायालयात हजर केले जाणार आहे. पोलिसांनी तपास करुन अवध्या चौदा दिवसात आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत. या प्रकरणाची न्यायलयीन सुनावणी जलदगतीने घेऊन आरोपीला कठोर शिक्षा होण्यासाठी शासन आणि पोलीस प्रयत्नशील आहेत. पीडीत बालिकेच्या कुटुंबीयांना न्याय मिळवून देणे, तसेच समाजात कठोर संदेश देण्यासाठी या प्रकरणाची जलदगतीने सुनावणी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

**– अजय मिसर, विशेष सरकारी वकील**

संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रम, जरूड ता. वरूड जि.अमरावती



*बुद्ध विहार समन्वय समिती, नागपूर * शांती वन चिंचोली*



द्वारा आयोजित

बाल संस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर * पालि भाषा प्रशिक्षण शिबिर

रविवार ते रविवार: दिनांक २४ ते ३१ मे, २०२६ स्थळ:- शांती वन चिंचोली नागपूर

उद्घाटन
रविवार दिनांक २४ मे, २०२६ दुपारी ४ ते ६
अध्यक्ष : प्रा. घनशाम धाबर्डे
(राष्ट्रीय कार्याध्यक्ष, बुद्ध विहार समन्वय समिती)
उद्घाटक : डॉ.अशोक बागुल (से.नि.IPS) नागपूर

समारोप
रविवार दिनांक ३१ मे, २०२६ सकाळी ९ वा.
अध्यक्ष : हरीकीसनदादा हटवार
(संत गाडगेबाबा बहुद्देशीय आश्रमाचे संस्थापक उपाध्यक्ष/ समिती, धम्म सभा सदस्य)
प्रमुख पाहुणे: पद्मश्री डॉ चंद्रशेखर मेश्राम (जागतिक मेंदूरोग तज्ञ)

विशेष अतिथी
कु.प्रणयाताई भालेकर(IAS) – उपजिल्हाधिकारी भंडारा

प्रमुख पाहुणे
नरेंद्र ताकसांडे – से.नि.चिफ इंजिनियर
विभुतीचंद्र गजभिये – कास्ट्राइब नेते

अतिथी
डॉ. एन. डी.पाटील – सुप्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ
डॉ. सुहास कानफाडे – सुप्रसिद्ध रोगनिदान आणि हार्ट रोगनिदान तज्ञ
डॉ. पल्लवीताई दराडे (IRS) – आयकर आयुक्त, मुंबई

प्रमुख उपस्थिती
सरदार जगजीत सिंग/ वैशाली नागरिक सेवा संघ, वैशाली नगर, नागपूर. नरेशजी धोपटे /मोतीलालजी नाईक /जीवनलाल गेडाम*स्मिताताई खैरनार, कर्जत * मेहेराताई गायकवाड, (खारघर मुंबई) सिलवकुमार रामटेके आणि सुचिताताई सुरेश बुरबरे परिवार /डॉ.राधाताई पहाडे पवार /डॉ.प्रमिलाताई चिंचखेडे

“ संयम ठेवणारा माणूस, प्रत्येक संकट पार करतो... ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



बहुजन सौरभ **संपादकीय**

# नाशिकचा सामाजिक इशारा

**म**हाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात काही आंदोलने ही केवळ निषेधापुरती मर्यादित राहत नाहीत, तर ती पुढील पिढ्यांना सामाजिक दिशा देणारी ठरतात. नाशिक येथे अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात विविध समाजघटकांनी एकत्र येऊन केलेले आंदोलन हे अशाच प्रकारचे ऐतिहासिक पाऊल मानावे लागेल. हा संघर्ष फक्त आरक्षणाचा नसून सामाजिक ऐक्य, संविधानिक बंधुभाव आणि दलित चळवळीच्या एकात्मतेचा प्रश्न आहे. १६ मे २०२६ रोजी "आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती"च्यावतीने नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शांततापूर्ण निदर्शने करण्यात आली. या आंदोलनाची तयारी एप्रिल महिन्यापासून सुरू होती. शहरातील विविध बुद्ध विहारांमध्ये कॉर्नर मिटिंग घेऊन जनजागृती करण्यात आली. समितीचे अध्यक्ष प्रकाश पगारे, माजी न्यायाधीश अनिल वैद्य, प्रवीण गांगुर्डे, पत्रकार अनिल आठवले, प्रतिक पगारे आणि राहुल जगताप यांनी समाजामध्ये उपवर्गीकरणाच्या प्रश्नावर चर्चा घडवून आणली. या बैठकांमध्ये एक महत्त्वाची बाब समोर आली - अनेक सामान्य महिला-पुरुषांना "उपवर्गीकरण" म्हणजे नेमके काय, याची पूर्ण माहिती नव्हती. मात्र "समाजावर संकट आले आहे, म्हणून आपण एकत्र राहिले पाहिजे," ही भावना स्पष्टपणे दिसत होती. अनेक महिलांनी मातंग समाजाला "आपले भाऊ" मानत प्रश्न उपस्थित केला की, "आपलेच लोक वेगळे का व्हावेत?" यामध्ये सामाजिक बंधुभावाची जाणीव प्रकर्षाने दिसून आली. नाशिकच्या आंदोलनाचा मुख्य संदेश स्पष्ट होता - "अनुसूचित जाती एक आहेत; त्यांचे विभाजन आम्हाला मान्य नाही." आंदोलनाची सुरुवात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून झाली. त्यानंतर विविध समाजांचे कार्यकर्ते एकत्र येत घोषणाबाजी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यासाठी जमले. हजारो लोकांचा सहभाग असूनही आंदोलन शांततापूर्ण आणि संविधानिक मार्गाने पार पडले, ही त्याची मोठी जमेची बाजू ठरली. सर्वोच्च न्यायालयाने काही परिस्थितीत राज्यांना अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण करण्याचा अधिकार दिल्यानंतर देशभरात या विषयावर चर्चा सुरू झाली आहे. महाराष्ट्र शासनानेही त्यासंदर्भात अभ्यास प्रक्रिया सुरू केल्याची माहिती समोर आली. मात्र आंदोलनकर्त्यांचा आक्षेप असा आहे की, महाराष्ट्रातील ५९ अनुसूचित जातींपैकी बहुसंख्य समाजांनी उपवर्गीकरणाची मागणी केलेली नाही. केवळ काही गटांच्या मागणीवर संपूर्ण समाजात फूट पाडणे योग्य ठरणार नाही. उपवर्गीकरण समर्थकांचे म्हणणे असे आहे की, काही जातींना आरक्षणाचा अधिक लाभ मिळाला, तर काही समाज अजूनही मागे आहेत. विशेषतः मातंग समाजातील काही संघटनांनी स्वतंत्र उपकोट्याची मागणी केली आहे. त्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक मागासलेपणाचे वास्तव नाकारता येणार नाही. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांनी प्रेरित या समाजाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात मोठे योगदान दिले आहे. त्यामुळे त्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. परंतु प्रश्न असा आहे की, या समस्येवर उपवर्गीकरण हाच एकमेव उपाय आहे का? नाशिकच्या आंदोलनातून पर्यायी विचार पुढे आला. मागासलेल्या समाजांसाठी स्वतंत्र विकास योजना, शैक्षणिक सुविधा, वसतिगृहे, कौशल्य प्रशिक्षण, उद्योग सहाय्य आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या योजना अधिक प्रभावी ठरू शकतात. आरक्षणाचे तुकडे करून सामाजिक न्याय साध्य होईलच असे नाही. आजही ग्रामीण महाराष्ट्रात अनेक अनुसूचित जातींतील गरीब कुटुंबांना शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक सन्मानासाठी संघर्ष करावा लागतो. अशा परिस्थितीत “एका समाजाने सर्व लाभ घेतले” असा सरसकट निष्कर्ष धोकादायक ठरू शकतो. सामाजिक प्रश्नांचे उत्तर विभाजनात नसून समान संधी निर्माण करण्यात आहे. इतिहास पाहिला तर दलित चळवळीची ताकद तिच्या एकात्मतेत राहिली आहे. महाड सत्याग्रह, चवदार तळे आंदोलन, मंदिर प्रवेश चळवळी आणि शिक्षण हक्काच्या संघर्षांमध्ये अस्पृश्य समाजांनी जातिभेद बाजूला ठेवून एकत्र लढा दिला. महाड सत्याग्रह हा केवळ पाण्याच्या हक्काचा नव्हता, तर मानवी सन्मानाचा संघर्ष होता. फुले, शाहू, आंबेडकर यांनी समतेवर आधारित समाजव्यवस्थेचा विचार मांडला. त्यामुळे “हा फुले-शाहू-आंबेडकरांचा महाराष्ट्र आहे; येथे जातींमध्ये फूट पाडू नये” हा आंदोलनकर्त्यांचा संदेश अत्यंत महत्त्वाचा ठरतो. नाशिकच्या आंदोलनाने आणखी एक गंभीर प्रश्न उपस्थित केला आहे. जर अनुसूचित जातींमध्ये उपवर्गीकरण झाले, तर भविष्यात प्रत्येक जात स्वतंत्र आरक्षणाची मागणी करेल का? त्यामुळे संविधानाने दिलेल्या सामूहिक संरक्षणाच्या संकल्पनेलाच धोका निर्माण होऊ शकतो. सामाजिक न्यायाच्या नावाखाली समाजाचे विखंडन होण्याचा धोका दुर्लक्षित करता येणार नाही. राजकीय पक्षांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. निवडणुकीच्या राजकारणात समाजांमध्ये विभागणी निर्माण करण्याचे प्रयत्न होत असतात. त्यामुळे उपवर्गीकरणाचा प्रश्न केवळ सामाजिक नसून राजकीयही बनतो. म्हणूनच या विषयावर सावध, अभ्यासपूर्ण आणि सर्वसमावेशक चर्चा होणे आवश्यक आहे. आज दलित समाजासमोर बेरोजगारी, शिक्षणातील विषमता, खाजगीकरण, ग्रामीण दारिद्र्य आणि सामाजिक भेदभाव यांसारखी गंभीर आव्हाने आहेत. अशावेळी अंतर्गत संघर्ष वाढवणे समाजाच्या सामूहिक शक्तीला कमकुवत करू शकते. म्हणूनच नाशिकमधील आंदोलन हा केवळ निषेध नव्हता; तो सामाजिक एकात्मतेचा घोष होता. शासनानेही या आंदोलनाचा संदेश समजून घेतला पाहिजे. कोणताही निर्णय घेताना सर्व समाजांचे प्रतिनिधित्व, सखोल अभ्यास, सामाजिक परिणाम आणि संविधानिक मूल्यांचा विचार होणे आवश्यक आहे. सामाजिक न्याय म्हणजे केवळ आरक्षणाचे विभाजन नव्हे; तर सर्व वंचित घटकांना समान संधी उपलब्ध करून देणे होय. नाशिकच्या आंदोलनाने दाखवून दिले की, अनुसूचित जाती समाज अजूनही एकजुटीची ताकद दाखवू शकतो. “अनुसूचित जातींची वज्रमूठ” ही घोषणा केवळ शब्द नाही; ती संविधानिक बंधुभावाचे टिकवण्याची सामूहिक शपथ आहे. त्यामुळे नाशिकचा हा संघर्ष केवळ आंदोलन नाही, तर सामाजिक ऐक्याचा नवा अध्याय ठरत आहे.●●

# आरक्षणाचे उपवर्गीकरण व शैक्षणिक नौकरीचे धोरण याचे नेमके गुपित काय?



**स**ध्या महाराष्ट्र सरकार योग्य मनुवादी दिशेने योग्य काम करत आसून ते आपल्या आर्य वंशाची स्थापना मूळ भारतीयांच्या भारतावर करून, त्यांना आपल्या वर्णव्यवस्थेचे नियोजनपूर्वक गुलाम बनवून पारतंत्र्यात ओढत आहे. असे स्पष्टपणे दिसत आहे. कारण काही करून भारतीयांवर आपले पुन्हा राज्य स्थापायचे व बहुजन भारतीयांचाच उपयोग करून स्वातंत्र्य युद्ध लढायचे हा त्यांचा इंग्रज सत्ता उलथवून टाकण्या पाठीमागचा मुख्य उद्देश होता. म्हणून आर्यवर्णीयांची १९२५ ला स्थापन झालेल्या आरएसएस नावाच्या मातृसंस्थेने कधीच स्वातंत्र्य युद्धात भाग न घेता इंग्रज सत्तेला आतून मदत केली. पण आखलेला डाव व उराशी बाळगलेली अभिलाषा यांचा चक्काचूर झाल्याने आजपर्यंत याच आरएसएसने आपल्या नागपूरी कार्यालयावर कधी भारताचा स्वातंत्र्यध्वज फडकवला नाही. कारण या भारतात भारतीयांचे लोकशाही पद्धतीचे राज्य स्थापण्यात याच भारतीय भूमीतला डॉ. आंबेडकर नावाचा माणूस यांना सरसी व कारणीभूत ठरला. यामुळे त्यांनी स्वातंत्र्यापासूनच प्रतिक्रांतीला सुरवात केली व ती त्यांच्या इच्छापूर्ती वळणावर आज आल्याचे सुखीस्वप्न त्यांना पडत आहे. म्हणून ते आज नियोजनपूर्वक कामाला लागले असून आपले आर्यवंशाचे राज्य स्थापण्यासाठी व त्याची आजच पायाभरणी लोकशाहीच्याच माध्यमातून करून ठेवण्यासाठी झटत आहेत. याचाच एक भाग म्हणून ज्या संविधानकर्त्याने मूळभारतीय माणसांचे मागासवर्गीय व अमागासवर्गीय असे वर्गीकरण करून, मागासवर्गीयांना आरक्षणाची कवचकुंडले देवून त्यांचे रक्षण केले व उच्च वर्णीयांच्या तावडीतून सुटका करून स्वाभिमानाने जीवन जगण्याचा व या देशाची शासनकर्ती जमात बनण्याचा संविधानिक हक्क बहाल केला, त्याच आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा डाव काही बुद्धीहिन समाजाच्या नेत्यांना हातासी धरून आखला व तो पूर्णत्वास नेला. या पाठीमागची कपटनीती या सरकारची हि होती की, मागासवर्गीय श्रृंखलेतला शेड्युल कास्ट हा पहिल्या श्रेणीचा वर्ग आहे व यातील बौद्ध हि सर्वात जास्त कायदा अभ्यासक व बुद्धीवंत जमात आहे. तसेच आपल्या आर्यवंशी राज्याच्या स्थापनेला यांच्यापासूनच सर्वात मोठा धोका आहे. कारण भारतीय बहुजन समाजातील बौद्ध समाजाच्या माणसांनाच सर्वात प्रथम मनुवादी राज्यकारभाराची दिशा व दशा समजते. बुद्धीबळाच्या पटावरील प्यादे उचलण्याअगोदरच आपली मनुवादी पुढील चाल या बौद्ध समाजाला समजते. तोच प्रथम त्यावर भाष्य करतो, लिहितो व बोलतो आणि मग इतर समाज जागृत होतो. हा आजपर्यंतचा मनुवादी राजकारण्यांचा पाठीशी असलेला अनुभव आहे. यासाठी आरक्षण उपवर्गीकरणाचा पहिला घाव हा याच बौद्ध समाजावर घातला पाहिजे अशी रणनीती आखलेकून बिनडोक लोकांना पुढे करून ती पूर्णत्वास नेण्याचा प्रयत्न केला. पण हे सारेच प्रकरण बौद्धांनी हसल्यावारी घेतले व या प्रकरणातील हवाच काढून टाकली. यामुळे ज्या समाजाचे नेते हूरळून ज्या लांडग्याच्या पाठी लागले होते तेच नेते त्यांच्याच समाजात उघडे पडले. कारण या हुरळून गेलेल्या मेंढरान समाजाच्या याच लांडग्याने लचका तोडला काय, किंवा जीवे मारून पर भाजून खाल्ला काय? हे विचारायला व आपल्या पाठीशी नेहमी बडील भावाप्रमाणे उभा रहात आलेला व राहिलेला बौद्ध समाज दूर झाला. मग आता आपण लांडग्याच्या कळपात जगायचे कसे? याचा पश्चाताप याच समाजातील काही उच्च विचारसरणीच्या लोकांना झाला व त्यांनी या बिनडोक बुद्धीहिन नेत्यांना धारेवर धरले. आता हे उपवर्गीकरण न्यायालयात टिकेल की नाही किंवा ते न्यायालयापर्यंत जाईल की नाही हा पुढचा भाग, पण आज जी अनु.जात वर्गाची हानी झाली व जी सामाजिक दरी निर्माण झाली ही भविष्यात लवकर भरून निघेल असे वाटत नाही. कारण ज्या समाजाने डॉ आंबेडकर नावाच्या बहुजन समाजाच्या बापाच्या स्वप्नाचांच चक्काचूर केला व आपल्या शहाणपणाचा व बुद्धीहिनतेचा टेंभा मिळवून वैऱ्याच्या संगतीने आजपर्यंतच्या बंधुभावावरच घाव घातला याचे नेमके काय करायचे? हा मोठा सामाजिक व भावनिक प्रश्न उरला आहे. यानंतर प्रश्न येतो तो या महाराष्ट्र सरकारच्या मनुवादी शैक्षणिक धोरणाचा. यात त्यांनी स्पर्धा परिक्षेसाठी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना येथूनपुढे ओपन वर्गातून लढता येणार नाही असा ठराव करून बंधन घातले. याचे ओपणच्या वर्गातील मुलांनी मोठे स्वागत केले. या त्यांच्या स्वगताचे मोठे कौतुक करावेसे वाटते. कारण हा निर्णय जसा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना रोखणारा आहे, तसाच तो ओपनच्या विद्यार्थ्यांनाही रोखणारा व लगाम घालणाराच आहे. उलट मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या फक्त ओपनच्या जागांवर लढून त्या मिळवण्याची हक्काची व बौद्धिक उच्चांकाचीच संधी गेली व संविधानिक आरक्षीत जागा तशाच राहिल्या. पण ओपण वर्गातील विद्यार्थ्यांच्या त्याही गेल्या. कारण हा मनुवादी कावा समजायला उच्चप्रतिचा मूळात बुद्धीगुणांक माणसात असावा लागतो. नेमका तोच ओपन समाजवर्गाच्या रक्तातील हिंदूत्वाने व मागासवर्गीय द्वेषाने खाल्लेला आहे. कारण आजपर्यंत ओपनच्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या जागा हा मनुवादी आर्यवंशीय समाजच खात आलेला आहे. कारण भारतात आर्यवंशीय समाज हा फक्त आणि फक्त साडेतीन टक्के आहे. पण त्याने न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था व राजकीय व्यवस्था यातील सर्वात जास्त जागा गिळलेल्या आहेत. साडेतीन टक्के समाज आज जवळजवळ नौकरीच्या सेवेत ५०%च्या वर आहे. साडेतीन टक्के असणारा समाज ५०% नौकऱ्यांच्या जागा मिळवतो, त्या नेमक्या कोणाच्या व कोणाच्या हिस्स्याच्या? हा मोठा प्रश्न आहे. पण तो कधी हिंदूत्वाचे विष पिलेल्या वर्गाला आजपर्यंत पडला नाही. याचे विशेष वाटते. आता तर या ठरावाने ओपनवाल्यांच्या जागा राजरोसपणे मिळवण्याचे आयते हत्यारच आर्यवंशीय समाजाला मिळालेले आहे. यामुळे आजपर्यंत न्यायव्यवस्था व विद्यापीठीय सेवेतच आपली शिरजोरी करणारे आर्यवंशी आता सर्वच माऱ्याच्या जागा आपल्या ताब्यात घेतील यात शंकाच नाही. यामुळे गावचा ग्रामसेवक, प्राथमिक शाळेपासून ते विद्यापीठाच्या कुलगुरूच्या जागेपर्यंत आर्यवंशी माणूस दिसल्यास याचे आश्चर्य ओपनच्या विद्यार्थ्यांना वाटता कामा नये. बरे यासाठी या महाराष्ट्र मनुवादी सरकारला शैक्षणिक पात्रता हवी असतेच असे काही नाही. कारण या अगोदर या सरकारने बऱ्याच माऱ्याच्या जागा कोणतीही शैक्षणिक पात्रता नसतानाही भरून घेतलेल्या आहेत. एवढेच काय याच वंशाच्या भारत सरकारने भारतीय रिझर्व बँकेचा गव्हर्नर हा सुद्धा इतिहासाचा पदवीधर दास करून दाखवलेला आहे. तेंव्हा भविष्यात आर्यवंशाचा माणूस कुठे आणि कोणत्या जागेवर कधी बसवायचा हे काही जाहिरात काढून व ओपनवाल्यांना जागे करून विचारायची गरज नाही. ते सरळ त्यांचे जोशी, कुलकर्णी, सारस्वत, अभ्यंकर, सहस्त्रबुद्धे पाठवून ओपनवाल्यांच्या बोकांडी बसवू शकतात. यात नवल असे काहीच नाही. ते त्यांच्या माणसांचे पुनर्वसन करण्यासाठी काहीही करू शकतात. हा त्यांच्या डाव्या हाताचा मळ आहे. म्हणजेच थोडक्यात सांगायचे म्हणजे, भारताचे जर हिंदूराष्ट्र करायचे असेल तर उद्या संपूर्ण मूळभारतीय बहुजन समाज आपला गुलाम बनवण्यासाठी त्याची तरतूद आजच करून ठेवली पाहिजे व ती त्यांच्या दृष्टीने पुढील काळाची गरज आहे. त्याची पायाभरणी ते आजच करून ठेवत आहेत. म्हणजेच त्यांना फक्त सामाजिक व्यवस्थेतच आपले वर्णश्रेष्ठत्व टिकवायचे नाही. तर ते राजकीय सत्तेप्रमाणेच शिक्षणात व शैक्षणिक सेवेतही टिकवून ठेवणे गरजेचे आहे. जेणे करून पुढील हिंदूराष्ट्र काळात मूळ भारतीय संपूर्ण बहुजन समाज हा आपल्या कवेत व आपल्या वर्णवर्चस्वाखाली गुलाम म्हणून कायमचा जखडबंद अवस्थेत राहिला पाहिजे व त्याची तरतूद आजच करून ठेवणेही तितकेच महत्त्वाचे आहे व तेच नेमकेपणाने ते आज मोठ्या विचारपूर्वक करत आहेत इतकेच. यात कोणाला विशेष वाटायचेही कारण नाही. कारण आपण पारतंत्र्यात आहोत की गुलामीत हेच आजपर्यंत ज्या मूळ भारतीयांना समजले नाही. तसेच आपला भारत स्वतंत्र झाला की परत आर्यवंशीय परकीय लोकांच्या ताब्यात गेलाय, हेच आजपर्यंत मूळ भारतीय बहुजनांना समजलेले नाही. यामुळे गुलामीत राहुन स्वातंत्र्याचे कोणी पाहू नये. कारण ज्याला गुलामीची जाणीव झाली त्यालाच स्वातंत्र्याचे स्वप्न पहाता येते व अधिकारही आहे. पण तो अधिकार मूळ भारतीय बहुजनांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्याच्या दिवशीच गमावला आहे. कारण असे नसते तर मूळ भारतीय वंशाचा बहुजन माणूस या देशाचा जास्तकाळ प्रधानमंत्री राहिला असता. पण तसे झाले नाही. आजपर्यंत सर्वात जास्त प्रधानमंत्री, राष्ट्रपती, राज्यपाल, राजदूत हे सर्व मोठ्याप्रमाणात आर्यवंशीच राहिलेले आहेत. तेंव्हा परकीय आर्यवंशाच्या ताब्यात आजपर्यंत राहिलेल्या मूळभारतीय समाजाला ' भारत माझा देश आहे ' असे म्हणून गप्प बसावे लागते. यासारखे जगात दुसरे कोणते मोठे आश्चर्य आहे का? भारत माझा देश म्हणायचे व देशावर राज्य दुसऱ्या परकीयांना करायला लावायचे यासारखा दुसरा मोठा कोणता विनोद आहे का? तेंव्हा हा विचारच जर मूळ भारतीयांच्या मेंदू बाहेरचा असेल तर त्यांनी ठेविले अनंते तैसेची रहावे. यातच त्यांनी गुलामीचा धर्म व धर्माच्या हिंदूत्वाचा आनंदी आनंद घ्यावा व स्वातंत्र्याचे स्वप्न पहाणे बंद करावे. ●●

दिपक गायकवाड
मो. 9765046493

# तामीळनाडूतील क्रांती-प्रतिक्रांती

**संघ-भाजपाचे 2026 चे गारदी बंगालमध्ये हुमायु व तामीळनाडूत विजय!**

**फे**सबुक मित्राच्या स्टॅलिनवरील पोस्टमधील पुढील एक वाक्य हृदयाला पीळ पाडणारे आहे - ''इतके करूनही एखाद्या माणसाचा पराभव होत असेल तर त्याने नक्की करावे तरी काय, हा सामान्य माणूस म्हणून मला पडलेला प्रश्नच आहे.'' पुढील वाक्य तर संवैधानिक व लोकशाही मार्गांवरचा विश्वास उडवणारे आहे - ''गेल्या ५ वर्षांत जे काम केले त्यानंतरही पराभव होणार असेल तर मग एखाद्या मुख्यमंत्र्याने आणखी काय करणे अपेक्षित आहे, हे कळत नाही...'' स्टॅलिनने व त्यांच्या पक्षाने मुख्यमंत्री म्हणून जी 15-16 क्रांतीकारक कामे केलेली आहेत, त्यांची निवडक नोंद आपण लेखाच्या दुसऱ्या भागात घेतलेली आहे.

फुले शाहू आंबेडकर व लोहिया यांच्या नावाने मतांचा जोगवा मागणारे बरेच मुख्यमंत्री या देशात होउन गेलेत व अजूनही होत आहेत, परंतू यापैकी अशा एखाद्या मुख्यमंत्र्याचे नाव सांगा ज्याने स्टॅलिनप्रमाणे एक तरी काम केलेले आहे. बरेच मुख्यमंत्री दलित की बेटी, डॉ. बाबासाहब का बेटा अशी सहनुभुती मिळवीत मते मागतात व मुख्यमंत्री झाल्याबरोबर संघ-भाजपाशी युती करतात व डॉ. बाबासाहेबांच्या हाथीला ब्राम्हणाचा गणेश बनविण्याचे काम करतात. ''पिछडा पावे सौ मे साठ'' असे ब्रीद वाक्य घेउन काम करणाऱ्या समाजवादी लोहियांचे अनेक लालू - मुलायमसारखे अनुयायी मुख्यमंत्री झालेत, परंतू पिछडा ओबीसींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण देणारा एकही मुख्यमंत्री ना समाजवाद्यांमधून निपजला ना फुले आंबेडकरवाद्यांमधून निपजला! सामी पेरियारवादच असे क्रांतीकारी मुख्यमंत्री निपजू शकतो, हाच मुद्दा वारंवार सिद्ध होतो. ओबीसी मुख्यमंत्री नितीश कुमारने ओबीसींचे आरक्षण लोकसंख्येच्या प्रमाणात वाढवायचा प्रयत्न केला, त्यासाठी त्यांनी आपल्या बिहार राज्यात जीवाची बाजू लावून जातनिहाय जनगणनाही केली. भाजपाशी दोस्ती करुन सत्ता भोगत असतांना ते तुम्हाला अशी क्रांतीकारी कामे करु देणारच नाहीत, किंबहुना संघ-भाजपाचे ब्राम्हण नाराज होतील, या भीतीपोटी तुमच्या मनात क्रांतिकारी विचार येउच शकत नाहीत, हे बहन मायावतीजींनी सिद्धच केले आहे.

नीतीश कुमार याबाबतीत हुशार ठरलेत. संघ-भाजपाच्या आशिर्वादाने एखादा दलित-ओबीसी मुख्यमंत्री होऊ शकतो, प्रधानमंत्रीही होऊ शकतो, परंतू जातनिहाय जनगननेसारखा क्रांतीकारी निर्णय घेतल्यावरही त्याची अंमलबजावणी तो दलित- ओबीसी मुख्यमंत्री करू शकत नाही. याचा अनुभव नीतीश कुमारने घेतला आणि केवळ जातनिहाय जनगणना करण्यासाठी नीतीशने भाजपाला लाथ मारून लालूप्रसाद यादवांशी युती केली व जातनिहाय जनगनना अनेक न्यायालयीन अडथळ्यांवर मात करीत पूर्ण केली.

तामीळनाडूच्या विजयची कथा काय सांगते? पश्चिम बंगालमध्ये संघ-भाजपाने जे घडवुन आणले तेच तामीळनाडूमध्येही घडले. प. बंगालमध्ये हुमायु कबीर नावाच्या मुसलमानाने बाबरी मशिद बांधण्याचा निर्धार केला आणि तो एका रात्रीतून मुसलमानांचा नेता बनला. त्याला बाबरी मशिद बांधण्यासाठी व ममता बॅनर्जींच्या पक्षाच्या विरोधात निवडणूका लढविण्यासाठी संघ-भाजपाने 1,000 कोटी दिल्याची क्लीप इंटरनेटवरून व्हायरल होताच MIM च्या ओवेशींनी त्याच्याशी असलेली निवडणूक युती तोडली. परंतू परिणाम जो व्हायचा तो झालाच! EVM, SIR, हुमायू व ओवेसी या चौघांचा एकत्रीत परिणाम म्हणजे ममता बॅनर्जींचा प्रचंड मोठा पराभव व हुमायू कबीरचा दोन्ही मतदारसंघातील विजय! एवढी घुसळण केल्यावर जे सत्तेचे लोणी निघाले ते अर्थातच संघ-भाजपाने पळविले. ममता बॅनर्जी व त्यांच्या पक्षाला पराभूत करण्यासाठी संघ-भाजापाचे ब्राम्हण हुमायू कबीर नावाच्या मुसलमानाला एक हजार कोटी रूपये देऊ शकतात तर स्टॅलिनचा व स्टॅलिनच्या पक्षाचा पराभव करण्यासाठी विजयला किती हजार करोड दिले असतील, याचा अंदाज करणे कठीण नाही. पश्चिम बंगालमध्ये तामीळनाडूप्रमाणे कोणतीही क्रांतीकारी विचारधारा राजकारणात नाही. ममता व त्यांचा पक्ष गांधीवादी ब्राम्हणी-भांडवलदारी पक्ष आहे. तरीही तेथील ब्राम्हणी-भांडवली पक्षाचा पराभव करण्यासाठी ब्राम्हणी संघ-भाजपाने एक हजार करोड रूपये हुमायु मुसलमानाला दिलेत, तर विचार करा क्रांतीकारी-अब्राम्हणी सामी पेरियारवादाला तामीळनाडूच्या सत्तेतून हद्दपार करण्यासाठी किती हजार करोड रूपये विजयला दिले असतील? या आधी संघ-भाजपाने असे प्रयत्न अनेकदा केलेत, मात्र ते सपशेल अपयशी ठरलेत. तामीळनाडूची जनता सिनेमावेडी आहे, असा (गैर)समज करून घेउन संघ-भाजपाने सर्वप्रथम रजनीकांत या सुपर स्टारला राजकारणात ‘बाहुला’ म्हणून नाचवला. रजनीकांतने 2017 साली स्वतःच्या नावाने सामाजिक संघटना (Rajani Makkal Mandram) स्थापन केली व राजकारणात येत असल्याचे सुतोवाच केले. राजकारणाच्या उद्देशाने स्थापन केलेल्या अशा सामाजिक संघटना सामाजिक कामासाठी नसतात तर त्या मदतीच्या नावाखाली लोकांना पैसे वाटण्यासाठी असतात. रेवडी (पैसे) देउन मते मिळविणे हाच एकमेव उद्देश या सामाजिक संघटनांचा असतो. समाजकार्याच्या नावाने रजनीकांतने करोडो रूपये वाटले. अर्थात राजकीय महत्वाकांक्षी लोक कधीही स्वतःच्या खिशातून पैसे खर्च करुन राजकारण करीत नाहीत. रजनीकांतलाही हुमायू मुसलमानाप्रमाणे करोडो रूपये दिले असणार यात शंका घेण्याचे कारण नाही. नंतर रजनीकांतने Makkal Sevai Katchi नावाचा पक्ष स्थापन केला व 2021 च्या निवडणुका लढण्याची घोषणा केली. परंतू रजनीकांतला संघ-भाजपाचे ब्राम्हणी षडयंत्र लक्षात आले असावे किंवा पेरियारवादी जनतेचा अंदाज आला असावा किंवा संघ-भाजपाशी केलेला करार (Deal) बिघडला असेल, कारण कोणतेही असो रजनीकांतने 2021 च्या निवडणूकांआधीच आपला पक्ष व संघटना बरखास्त केलेत व राजकारणाचा कायमस्वरूपी त्याग केला. रजनीकांतनंतर संघ-भाजपाने दुसरा बळीचा बकरा शोधला. कमल हासन नावाचा सुपर स्टार! तोही रजनीकांतच्याच मार्गाने पुढे जातो आहे. त्याने पक्ष स्थापन केल्यानंतर निवडणूका लढविण्याच्या अनेक घोषणा केल्यात. 2021 पासून अनेक निवडणूका झाल्यात, मात्र अजून कमल हासन साधी नगरपालिकेची निवडणूकही लढू शकलेला नाही. सिनेमा स्टारची ही दोन्ही षडयंत्रे सपशेल निकामी ठरलीतण याचे खरे कारण संघ-भाजपाने शोधून काढले! काय आहे नेमके कारण, आणि त्यातून संघ-भाजपा काय शिकला? कोणतेही तत्वज्ञान हे भुतकाळाच्या अभ्यासातून वर्तमानकालीन व भविष्यकालीन समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी मार्गदर्शन करीत असते. मात्र ब्राम्हणी तत्वज्ञान हे असे एकमात्र तत्वज्ञान आहे जे प्रत्यक्ष ठेंच लागल्यावरच पुढे सरकत असते. ब्राम्हणी तत्वज्ञान हे पाठीमागून ‘धक्कामार’ तत्वज्ञान आहे. रजनीकांत व कमल हासन या दोन ठेंचा लागल्यानंतर संघ-भाजपाच्या असे लक्षात आले की, तामीळनाडूची जनता सिनेमा-वेडी नाही. तामीळनाडूच्या जनतेने करूनानिधी, रामचंद्रन व जयललिता यांना डोक्यावर घेतले व अनेकवेळा मुख्यमंत्रीही केले. करूनानिधी, रामचंद्रन व जयललिता हे सेनेमा सृष्टीतील दिग्गज होते. म्हणून तामीळनाडूच्या जनतेने त्यांना डोक्यावर घेतले का, तर अजिबात नाही. तसे असते तर आज विजयच्या जागी रजनीकांत वा कमल हासन मुख्यमंत्री दिसले असते. कारण रजनीकांत व कमल हासन हे दोघे विजयपेक्षा हजार पटीने मोठे सुपरस्टार आहेत व बॉलिवूडने त्यांना अखिल भारतीय सुपरस्टार बनविले आहे. विजयचा एकतरी सिनेमा आहे का बॉलिवूडमध्ये? करूणानिधी, रामचंद्रन व जयललिता हे तिघे अत्यंत प्रमाणिकपणे सामी पेरियारवादी होते. म्हणून तामीळनाडूच्या जनतेने त्यांना अनेकवेळा मुख्यमंत्री केले. तामीळनाडूच्या जनतेला उच्च पातळीवरची वैचारिक मानसिकता आहे आणि ही मानसिकता पेरियारवादाने निर्माण केली व पेरियारवादी राजकारणाने ती अधिक घट्ट केली.





प्रा. श्रावण देवरे
मो. 9422788546

पेरियारवादाला नेस्तनाबूत करण्यासाठी दुसऱ्या एखाद्या पुरोगामी परंतू पेरियारवादाच्या तोडीच्या तत्वज्ञानाचा वापर करावा लागेल, हे संघ-भाजपाच्या ब्राम्हणांना लक्षात आले. लोहे को लोहा कांटता है, या न्यायाने संघ-भाजपाने विजयच्या हातात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो दिला आणि विजयचे जातीअंताकडून जातवादाकडचे राजकारण सुरू झाले.

विजयच्या हातात फक्त डॉ. बाबासाहेबांचा फोटो दिला, विचार नाही दिलेत. भारतात जात-जाणिवा निर्माण करण्यासाठी व जातीय ईगो जागृत करण्यासाठी फक्त फोटो, पुतळे, हार-तुरे व जयजयकार एवढे पुरेसे असते. विजयला कोणताही वैचारिक इतिहास नाही. फक्त फोटो घेउन फिरला आणि काम झाले. तामीळनाडूमध्ये सर्व जाती-धर्मांच्या जनतेला लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण व शासन-प्रशासनात सहभाग मिळतो. त्यामुळे जाती-जातीत व धर्मा-धर्मांत दंगली घडवून आणण्याचे ब्राम्हणी षडयंत्र तेथे कधीच यशस्वी होऊ शकत नाही. मात्र केवळ समान सवलती व शासन-प्रशासनात समान सहभाग दिल्याने जातीव्यवस्था नष्ट होत नाही, त्यामुळे फक्त जाती-जातीतला व धर्मा-धर्मातला संघर्ष थांबतो. मात्र जोपर्यंत जातीव्यवस्था जीवंत आहे तोपर्यंत जात-जाणीवा जीवंतच राहतात. या जात जाणीवांचाच (दुरू)पयोग संघ-भाजपाने करायचे ठरविले व त्यात ते यशस्वी झालेत. तामीळनाडूत सामी पेरियारवादी राजकारण 60 वर्षांपासून सत्तेत आहे. शेकडो वर्षांपासुनची घट्ट झालेली कर्मठ व जरठ जातीव्यवस्था 60-70 वर्षात नष्ट करणे अशक्य आहे. ज्याप्रमाणे जातीव्यवस्था टप्प्या-टप्प्याने व शास्त्रीय पद्धतीने अस्तित्वात आली, त्याचप्रमाणे तीला नष्ट करण्यासाठीसुद्धा अनेक टप्पे पार पाडावे लागतील व त्याचे शास्त्रीय तत्वज्ञानही विकसित करावे लागेल. परंतू तुम्ही जातीअंताकडचे टप्पे पार करित असतांना ब्राम्हणवादी छावणी तुमची गंमत बघत शांत बसणार नाही. ती तुम्हाला मध्येच एखाद्या टप्प्यावर गाठेल आणि तुम्हाला गारद करेल. त्याप्रमाणे संघ-भाजपाच्या ब्राम्हणी छावणीने ‘गारदी’ शोधला, त्याला सुपारी दिली आणि जातीअंताकडे जाणाऱ्या पेरियारवादी राजकारणाचा घात झाला. असे समाजविघातक गारदी संघ-भाजपाने प्रत्येक राज्यात निर्माण करून ठेवलेले आहेत. महाराष्ट्राच्या जनतेलाही आपला गारदी कोण हे माहित झाले आहे. पेरियारवादी क्रांतीकारक राजकारणाचा घात केल्यावर विजयची ब्राम्हणी प्रतिक्रांतीची ‘घोडदौड’ कशी सुरू झाली आहे, तीचा आढावा आपण पुढील चौथ्या भागात घेऊ या! ●●

# बोधिसत्व म्हणजे काय ?



**“बो**धी” म्हणजे महान ज्ञान आणि “सत्त्व” म्हणजे प्राणी किंवा जिवंत मनुष्य. त्यामुळे “बोधिसत्व” म्हणजे असा मनुष्य जो भविष्यात निश्चितपणे बुद्धत्व प्राप्त करणार आहे आणि त्या दिशेने सतत प्रयत्नशील आहे. बुद्धत्व प्राप्त होण्यापूर्वी राजकुमार सिद्धार्थ गौतम यांना देखील “बोधिसत्व” असेच संबोधले जात होते. बोधिसत्व हा केवळ धार्मिक शब्द नसून तो मानवाच्या मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक उन्नतीचा प्रवास दर्शवणारा विचार आहे.

बौद्ध धम्मात “जन्म” म्हणजे केवळ शरीराचा मृत्यू होऊन पुन्हा जन्म घेणे असा अर्थ नाही. येथे जन्म म्हणजे मानसिक परिवर्तन, विचारांची क्रांती आणि जीवनदृष्टीतील बदल होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करून बुद्ध धम्माची दीक्षा घेतल्यानंतर “माझा पुनर्जन्म झाला आहे” असे म्हटले होते. याचा अर्थ त्यांच्या मनात नवा विचार, नवी मूल्ये आणि नवे मानवतावादी तत्त्वज्ञान जन्माला आले होते. बोधिसत्व म्हणजे जो बुद्धत्व प्राप्त करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतो. हा प्रवास अनेक मानसिक आणि नैतिक अवस्थांमधून पुढे जातो. बुद्धांनी या प्रवासातील चार प्रमुख अवस्था सांगितल्या आहेत —

१) सोतापन्न, २) सकृदागामी, ३) अनागामी, ४) अर्हत,

**१) सोतापन्न अवस्था :** “सोतापन्न” म्हणजे धम्माच्या प्रवाहात प्रवेश करणारा. अशा व्यक्तीचे चित्त शुद्धतेच्या मार्गावर लागलेले असते. तो व्यक्ती तीन प्रमुख बंधनांपासून मुक्त होऊ लागतो — मीपणा किंवा अहंकार संशय वृत्ती अंध परंपरा आणि कर्मकांडांना चिकटून राहणे ही अवस्था प्राप्त झाल्यानंतर माणूस विवेकशील बनतो. तो अंधश्रद्धा, जातीभेद आणि खोट्या परंपरांपासून दूर जाऊन सत्य, करुणा आणि प्रज्ञेच्या मार्गाने चालू लागतो.

**२) सकृदागामी अवस्था :** ही अवस्था म्हणजे कुशल कर्म करण्याची दृढ प्रवृत्ती निर्माण होणे. या टप्प्यावर व्यक्ती आपल्या मनातील लोभ, क्रोध आणि द्वेष यांवर नियंत्रण मिळवू लागतो. त्याच्या आचरणात संयम, शिस्त आणि नैतिकता वाढते. तो समाजाच्या कल्याणाचा विचार करू लागतो.

**३) अनागामी अवस्था :** “अनागामी” म्हणजे जो अकुशल कर्माची कल्पनाही करीत नाही. ही अत्यंत उंच मानसिक अवस्था आहे. अशा व्यक्तीच्या मनात वासना, तृष्णा आणि द्वेष राहत नाही. तो पूर्णतः शांत, करुणामय आणि समतावादी बनतो. त्याचे जीवन इतरांच्या कल्याणासाठी वाहिलेले असते.

**४) अर्हत अवस्था :** “अर्हत” म्हणजे ज्याने मनातील सर्व बंधने नष्ट केली आहेत. त्याचे चित्त पूर्णतः शुद्ध झालेले असते. तो आर्य अष्टांगिक मार्ग पूर्णपणे स्वीकारतो. त्याचे मन विचलित होत नाही. तो लोभ, मोह, क्रोध आणि अहंकार यांपासून मुक्त झालेला असतो. बौद्ध धम्मानुसार ही मुक्तीची अवस्था आहे. परंतु बुद्धत्व ही अवस्था अर्हत पदाहूनही श्रेष्ठ मानली जाते. बुद्ध म्हणजे जो स्वतः मुक्त होऊन संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी कार्य करतो. त्याच्या मनात सर्व जीवांबद्दल करुणा, मैत्री आणि प्रेम असते.

**बोधिसत्वाच्या दहा भूमिका :** महायान बौद्ध परंपरेत बोधिसत्वाच्या प्रगतीच्या दहा भूमिका सांगितल्या आहेत.

**१) मुदिता :** पहिल्या टप्प्यात बोधिसत्व आपल्या मनातील अशुद्धता दूर करून आनंदी आणि सकारात्मक बनतो. सर्व प्राणिमात्राच्या कल्याणाची भावना त्याच्या मनात निर्माण होते.

**२) विमला भूमी :** या अवस्थेत तो कामवासना आणि स्वार्थी विचारांपासून मुक्त होतो. त्याच्यात करुणा वाढते.

**३) प्रभाकरी भूमी :** त्याची प्रज्ञा दर्पणासारखी स्वच्छ होते. तो अनात्म आणि अनित्य या सिद्धांतांना समजून घेतो.

**४) अर्चिस्मती भूमी :** या अवस्थेत बोधिसत्वाचे संपूर्ण लक्ष आर्य अष्टांगिक मार्गावर केंद्रित होते.

**५) सुदुर्जया भूमी :** तो सापेक्ष आणि निरपेक्ष सत्य समजून घेतो. कार्य-कारण नियमाची जाणीव त्याला होते.

**६) अभिमुखी भूमी :** तो प्रतीत्यसमुत्पाद आणि बारा निदानांचे सखोल ज्ञान आत्मसात करतो.

**७) दुर्गमा भूमी :** या अवस्थेत तो तृष्णामुक्त होतो. तो दानशील, क्षमाशील, वीर्यवान आणि प्रज्ञावान बनतो.

**८) अचल भूमी :** बोधिसत्व स्थिरचित्त होतो. त्याच्याकडून सहजपणे कुशल कर्म घडतात.

**९) साधुमती भूमी :** तो धम्माच्या सर्व दिशांचा आणि काळाचा अडसर पार करतो. त्याचे ज्ञान व्यापक बनते.

**१०) धर्ममेघ भूमी :** ही बुद्धत्वाच्या अगदी जवळची अवस्था आहे. या अवस्थेत बोधिसत्वाला दिव्य प्रज्ञा प्राप्त होते आणि तो मानवकल्याणासाठी स्वतःला समर्पित करतो.

**बोधिसत्वाचे गुण :** बोधिसत्व हा करुणा, मैत्री, प्रज्ञा आणि त्याग यांचा संगम असतो. तो नेहमी आनंदी आणि सकारात्मक असतो. त्याच्यात अहंकार नसतो. तो तृष्णामुक्त, दानशील, क्षमाशील आणि विवेकी असतो. तो सर्व जीवांच्या कल्याणासाठी कार्य करतो. त्याचे जीवन मानवतेच्या सेवेसाठी वाहिलेले असते. बोधिसत्व स्वतःच्या मुक्तीपुरते मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण समाजाच्या उन्नतीसाठी संघर्ष करतो. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अनेक अनुयायी “आधुनिक बोधिसत्व” म्हणतात. कारण त्यांनी स्वतःचे जीवन बहुजन समाजाच्या मुक्तीसाठी समर्पित केले. बोधिसत्वाचा मार्ग हा संघर्ष, संयम आणि सतत आत्मपरिवर्तनाचा मार्ग आहे. हा मार्ग माणसाला स्वार्थापासून परमार्थाकडे, अज्ञानापासून ज्ञानाकडे आणि अन्यायापासून समतेकडे घेऊन जातो. आजच्या समाजात द्वेष, हिंसा, अंधश्रद्धा आणि विषमता वाढत असताना बोधिसत्वाचा विचार अधिक महत्त्वाचा ठरतो. मानवतेवर प्रेम करणारा, समतेसाठी संघर्ष करणारा, सत्याचा स्वीकार करणारा आणि सर्वांच्या कल्याणासाठी स्वतःला समर्पित करणारा प्रत्येक माणूस बोधिसत्व होण्याच्या मार्गावर असतो. त्यामुळे बोधिसत्व ही केवळ धार्मिक संकल्पना नसून मानवमुक्तीची आणि प्रज्ञेची महान जीवनदृष्टी आहे.●●

तथागताची सत्यगाथा



देविदास राऊत
(बौद्धाचार्य)
मो. 8668238330

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### छान प्रकाश टाकला आंबेडकरी कव्वाली या विषयावर

**खू**प सविस्तर मांडणी. कालचे प्रबोधनकार आणि आजचे प्रबोधनकार यांच्या गायकीत, प्रबोधन शैलीत, शब्दात, गीत रचनेत खूप फरक आहे. आजच्या गायकांचे गीत लक्षात राहत नाही. कारण ती गिते चळवळीचे प्रबोधन करणारी नाहीत. उथळ स्वभावाची शिवराळ शब्दातील आहेत. वामनदादांची गीते वास्तव मांडत होती. ते एक स्वतः प्रतिभाशाली साहित्यिक होते. स्वतः रचना करायचे. आजचे गायक उचलेगीरी करतात गीतांची. त्यात फारसा दमदार आशय नसतो. यमकांची जुळवाजुळवच असते. भडव्यांनो, साल्यांनो, तुमच्या मायला घोडा लागो अशा शब्दात लोकांना सुनावतात. आजच्या गायकात ती प्रतीभा नाही. केवळ पैशासाठी, पोटासाठी कार्यक्रम करतात. चळवळीसाठी, लोकांच्या प्रबोधनासाठी मुळीच नसतात. यावर अंकुश लागायला पाहिजे, सुधारणा व्हायला पाहिजे. काही गायक अजुनही दमदार गीते सादर करतात. छान मांडणी केलीत आपण सडेतोड. यामध्ये वामनदादा कर्डक यांच्या काही प्रबोधनपर गीतांचे दाखलेही देता आले असते. जयभीम तुझ्या हाती तूप आलं, तुझ्या साय समाचं काय रं गड्या समाजाचं काय? भिमाची लेखणी.... तुफानातील दिवे आम्ही..... असे अनेक गीते आहेत. बुद्धावरील गाजलेली गीते आहेत. असो. छान प्रकाश टाकला आंबेडकरी कव्वाली या विषयावर. ●●

अरून विघने

“ जीवनात संयम ठेवा, तोच यशाचा मार्ग आहे. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# आरक्षित प्रवर्गाचे मेरिट नाकारणारा तुघलकी निर्णय...!

**महाराष्ट्र शासनाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयानुसार, राखीव प्रवर्गातील ज्या उमेदवारांनी स्पर्धा परीक्षांमध्ये वयोमर्यादा, शैक्षणिक पात्रता किंवा अनुभवामध्ये सवलत घेतली आहे, त्यांना आता खुल्या प्रवर्गातील जागांवर दावा करता येणार नाही. अशा उमेदवारांची निवड केवळ राखीव कोट्यातूनच केली जाईल.**

महाराष्ट्र शासनाचा हा निर्णय म्हणजे संविधानाच्या अनुच्छेद १४, १५ आणि १६ चे उल्लंघन असून संविधानाने राज्य सरकारवर मागासवर्गीयांच्या हिताचे संरक्षण करण्याच्या सोपविलेल्या जबाबदारीचे भान न ठेवता काढलेला तुघलकी निर्णय आहे.

**खुला प्रवर्ग म्हणजे काय:**

सामान्यातः खुला प्रवर्ग म्हणजे शैक्षणिक प्रवेश आणि नोकर भरतीमध्ये कोणत्याही जात किंवा आरक्षित प्रवर्गासाठी आरक्षित नसलेल्या जागांचा प्रवर्ग होय. या प्रवर्गात जात किंवा धर्मापेक्षा केवळ गुणवत्तेला प्राधान्य असते. खुला प्रवर्ग हा 'सर्वांसाठी खुला' असून या प्रवर्गात केवळ गुणवत्तेच्या आधारे कोणत्याही उमेदवाराला प्रवेश मिळण्याचा अधिकार असतो.

**सर्वोच्च न्यायालयाचे निर्णय :**

सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी स्पष्ट केले की, खुल्या प्रवर्गात केवळ गुणवत्ता महत्त्वाची असते. जर एखाद्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवाराने खुल्या प्रवर्गाच्या कट-ऑफइतके किंवा त्याहून अधिक गुण मिळवले, तर त्याची निवड खुल्या प्रवर्गातच केली जाते. एका महत्त्वाच्या निर्णयात न्यायालयाने म्हटले आहे की, जर एखाद्या उमेदवाराने केवळ पात्रता परीक्षेमध्ये वयाची किंवा शुल्काची सवलत घेतली असेल, परंतु मुख्य परीक्षेत तो खुल्या प्रवर्गातील उमेदवारांइतके किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवत असेल, तर त्याला खुल्या प्रवर्गात जाण्यापासून रोखता येणार नाही. न्यायालयाने पुन्हा एकदा हे अधोरेखित केले आहे की, 'खुला प्रवर्ग' हा उच्च जातींसाठी राखीव असलेला कोटा नाही. तो एक गुणवत्तेचा प्रवर्ग आहे, ज्यामध्ये कोणत्याही जातीचा किंवा धर्माचा उमेदवार स्वतःच्या गुणवत्तेवर स्थान मिळवू शकतो. एका ठिकाणी आरक्षणाचा व दुसऱ्या ठिकाणी खुल्या प्रवर्गाचा लाभ घेणे म्हणजे दुहेरी फायदा होय असा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला असून दुहेरी फायदा ही संकल्पना अमान्य केली आहे. आरक्षित उमेदवाराला मिळालेली सवलत ही केवळ स्पर्धेत 'समान संधी' मिळवण्यासाठी असते, तर निवड ही केवळ गुणवत्तेवर आधारित असते असे स्पष्ट केले आहे. मार्च २०२६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मुंबई उच्च न्यायालयाचा २०२५ चा एक निर्णय रद्द केला. उच्च न्यायालयाने म्हटले होते की सवलत घेणारे आरक्षित उमेदवार खुल्या प्रवर्गात जाऊ शकत नाहीत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने हे चुकीचे ठरवत अशा उमेदवारांना खुल्या प्रवर्गात सामावून घेण्याचे आदेश दिले आहेत.

**खुल्या प्रवर्गातील लोकांचा आक्षेप :**

खुल्या प्रवर्गातील लोकांनी आरक्षित उमेदवारांच्या खुल्या प्रवर्गातील नियुक्ती बाबत आक्षेप घेऊन न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर न्यायालयाने खुल्या प्रवर्गाबाबत राज्यांनी स्पष्टता करावी असे म्हटले. मात्र महाराष्ट्र सरकारने याचा सोयीनुसार अर्थ काढून सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांची अवहेलना करून वय, शैक्षणिक पात्रता, परीक्षा शुल्क, परीक्षेत बसण्याच्या संधी याचा लाभ घेणाऱ्या आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना त्यांनी स्पर्धा परीक्षेत मेरिट मिळविले तरी त्यांची खुल्या प्रवर्गातून निवड होणार नाही तर त्यांना त्यांच्यासाठी राखीव असलेल्या पदांमध्येच निवड होईल असा असंवैधानिक आणि तुघलकी निर्णय घेऊन आरक्षित प्रवर्गातील बहुसंख्य म्हणजे ८५ टक्के उमेदवारांवर अन्याय केला आहे.

**आरक्षण संपविण्याचे कटकारस्थान :**

महाराष्ट्र सरकार वेळोवेळी अनेकविध तंत्र व कपट नीतीचा अवलंब करून राज्यातील आरक्षण व्यवस्था पूर्णतः संपवून टाकण्याचे षडयंत्र राबवित आहे. अलिकडे सरकारी नोकऱ्या मोठ्या प्रमाणात गोठवून कंत्राटी पद्धतीने नोकरभरती केली जात आहे, ज्यात आरक्षण नाही. तर जवळपास सर्वच क्षेत्राचे खाजकीकरण करून सरकारी नोकऱ्या कमी केल्या आहेत. परिणामी आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना फक्त एमपीएससी व युपीएससी परीक्षांच्या माध्यमातूनच सरकारी नोकरी मिळविण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे करोडो विद्यार्थी अत्यंत परिश्रमाने या परीक्षांची तयारी करतात. आपली गुणवत्ता सिद्ध करून नोकरी मिळविण्याची संधी प्राप्त करतात. मात्र अलिकडे शासनाने आरक्षित प्रवर्गाच्या हिताविरुद्ध अनुसूचित जाती मध्ये अबकड असे उपवर्गीकरण करण्याचा घाट घातला असून आता आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना आपल्या मेरिटनुसार खुल्या प्रवर्गातून निवडीची संधी नाकारली आहे. शासनाचे हे धोरण आरक्षण संपुष्टात आणण्याचेच धोरण नव्हे काय?



प्रा· डॉ· एम·आर·इंगळे
मो. 9423429060




**आरक्षणधारी वर्गाने सजग व एकसंघ राहण्याची गरज :**

एक फार सुंदर आणि प्रेरणादायी गोष्ट आहे. ₹एका गावात एक वृद्ध शेतकरी राहत होता. त्याला पाच मुले होती. ती पाचही मुले नेहमी एकमेकांशी भांडत असत. शेतकऱ्याने त्यांना अनेकदा समजावून सांगितले, पण त्यांच्या भांडणात काहीच फरक पडला नाही. एक दिवस शेतकरी आजारी पडला. त्याने आपल्या पाचही मुलांना जवळ बोलावले. त्याने पाच लाकडी काठ्या मागवल्या आणि एका मुलाच्या हातात एक काठी देऊन ती मोडण्यास सांगितली. त्या मुलाने ती काठी सहज मोडून टाकली. त्यानंतर प्रत्येकाला एकेक काठी देऊन ती मोडण्यास सांगितली, सर्वांनी ती काठी सहज मोडली. आता शेतकऱ्याने त्या पाचही काठ्या एकत्र केल्या आणि त्यांची एक घट्ट जुडी बांधली. त्याने एकेका मुलाला ती जुडी मोडायला सांगितली. मुलांनी खूप प्रयत्न केले, पण ती काठ्यांची जुडी कोणालाही मोडता आली नाही. हे पाहून शेतकरी मुलांना म्हणाला, ₹मुलांनो, तुम्ही या काठ्यांसारखे आहात. जर तुम्ही वेगळे राहिलात, तर तुम्हाला कोणीही सहज त्रास देऊ शकेल किंवा हरवू शकेल. पण जर तुम्ही या काठ्यांच्या जुडीसारखे एकसंघ राहिलात, तर तुमचे कोणीही काही वाकडे करू शकणार नाही.₹ यावरून आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, एकतेमध्येच खरी शक्ती असते. म्हणून आरक्षित प्रवर्गातील समाजाने सजग व एकसंघ राहणे काळाची गरज आहे. ●●

# अनुकरण

**अनंतायन**



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

आजी आपल्या छोट्या नातवाला घेऊन सकाळी मंदिरात आली. ती गणपती स्तोत्र वाचू लागली. नातू डोळे मिटून शांत बसला होता. त्यानंतर पुजा, आरतीतही तो आनंदाने सहभागी झाला. इतर लहान मुले मात्र गडबड, गोंधळ करीत होती. सायंकाळी त्याचे वडील त्याला सार्वजनिक वाचनालयात घेऊन आले. वडील वाचनात गुंग झालेले. तो देखील कार्टून आणि विविध चित्र असलेली लहान मुलांची पुस्तके चाळण्यात तल्लीन झाला. त्यांचा हा दिनक्रम ठरलेला.

एके दिवशी त्यांचा शेजारी म्हणाला, ‘माझे नातू सतत टिव्ही आणि मोबाइलमध्ये गुंतलेले असतात, पण तुमचा मुलगा पुस्तके आणि प्रार्थनेत रमलेला असतो. हे कसे काय शिकवले त्याला? आमचे नातू तर आमचे जरा सुद्धा ऐकत नाहीत. ‘त्यावर मुलाचे वडील म्हणाले, ‘मुले कुठे कोणाचे काही ऐकतात? मुले तर फक्त वडीलधाऱ्यांची नक्कल करतात.’

ते आपले अनुकरण करतात, या गोष्टीचे ज्येष्ठांनी स्मरण ठेवावे. कारण त्यावरच लेकरांचे आचरण अवलंबून असते, त्यावर शेजारी म्हणाला, ‘खरं आहे तुमचे. लहान लेकरांचे मन हे कोऱ्या कागदासारखे असते.’ त्यामध्ये संस्काराचे रंग भरणे ही आपली जबाबदारी आहे. लहान मुलांना एखादे खेळणे किंवा भेटवस्तू जर दिली नाही तर, तो काही वेळ रडेल. पण योग्य संस्काराची भेट वेळेवर दिल्या गेली नाही तर, त्याच्यावर आयुष्यभर रडायची वेळ येईल. मुलांना संस्काराशिवाय सुविधा दिल्या तर तो भरकटत जाऊ शकतो, हे आज मला समजले.''मिलता है जो हमें, परिवार से संस्कार में, जाता नहीं वह कभी भी, यूँ बेकार में डिग्री महज़ एक काग़ज़ का टूकडा है, शिक्षा दिखें ना अगर रोज, आपके व्यवहार में.●●

बहुजन सौरभ

# झुरळे, परजिवी आणि शुद्र बेरोजगार

**चीफ जस्टीस ऑफ इंडिया यांनी भारतातल्या बेरोजगार तरुणांना झुरळ आणि परजीवी म्हटले, हे वक्तव्य सहज नाही तर जाणून-बुजून केलेले वक्तव्य आहे. मधे मधे बहुजन जनतेला नीच दाखवायचे, शुद्र दाखवायचे स्टेटमेंट करीत राहणे हे आरएसएसच्या कुटनीतीचा एक भाग आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे.**




ब्राह्मणांनी शूद्रांना त्यांच्या दर्जाची म्हणजेच औकातीची जाणीव सतत देत राहावी असे मनुस्मृतीचे म्हणने आहे. सी जे आय सूर्यकांत शर्मा हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या फॅक्टरीतून आलेले आहेत, आणि विशेष म्हणजे ते ब्राह्मण आहेत म्हणून जन्मजात संघाच्या विचारांचे प्रतिनिधित्व करतात संघ हा वर्णव्यवस्थेचा कट्टर पुरस्कर्ता आहे .भारतात आजही वर्णव्यवस्था सक्रिय आहे. इथे सगळी कामे वर्णव्यवस्थेनुसारच होत असतात ,पण आपल्याला ती जाणवत नाही ह्याचे कारण इथल्या बहुसंख्य हिंदू समाजाला ब्राह्मणधर्माची, आणि देववाद व दैववादाची सवय झाल्यामुळे त्यांना अन्याय, अत्याचाराची व अपमानाची जाणीवच होत नाही.

देववाद आणि दैववादामुळे वरच्या वर्गाने कितीही अन्याय केला, अत्याचार केला, अपमान केला तरी बहुजन समाज तो देवावर आणि दैवावर ढकलून मोकळा होतो. अन्यायाचा,अपमानाचा बदला घेण्याचा विचारसुद्धा त्याच्या मनात येत नाही.

सी.जे.आय. सूर्यकांत शर्मा हा कट्टरसंघिय आणि जातीवादी आहे. याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप असूनही हा व्यक्ती सीजेआय झालेला आहे, कारण तो जातीने ब्राह्मण आहे ,इतर मागासवर्गीय जातीचा असता तर भ्रष्टाचाराचे प्रकरण पेंडिंग ठेवून त्याला प्रमोशन नाकारल्या गेले असते.

हे संघातून आलेले लोक मधे मधे इथल्या शुद्र जनतेला डीचवून जनतेचा अपमान करुन जनतेची टेस्टचेक करीत असतात की जनता किती टक्के ब्राह्मणवादाच्या प्रभावात आहे. यांच्या वक्तव्याच्या विरोधात जनता जर उभी झाली तर हे लोक माफी मागून , दिलगिरी व्यक्त करून किंवा मीडियाला दोष देऊन मोकळे होतात आणि जनतेने काहीही प्रतिक्रिया केली नाही तर मग हे आश्वस्त होतात की आजही ह्या देशात आपले वर्चस्व कायम आहे. याच उद्देशातून सीजीआय शर्माने इथल्या तरुणांना काक्रोच आणि परजिवी म्हटलेले आहे.

या देशात बेरोजगारी आहे हे सत्य आहे पण ब्राह्मण जातीत बेरोजगारी आहे हे असत्य आहे. भारतातल्या एकूण बेरोजगारांपैकी 83 टक्के बेरोजगार हे तरुण आहेत हा बीबीसीचा आकडा आहे.



प्रमोद मून
मो.94230 63127

असे असले तरी जातीच्या कोणातून बेरोजगारीचा दर पाहिला तर ब्राह्मण वर्गात बेरोजगारी शून्य आहे . जी बेरोजगारी आहे ती ब्राह्मण व्यतिरिक्त इतर मागासवर्गीय जातीत आहे म्हणून सीजेआय शर्मा ने इतर मागासवर्गीय जातीतल्या युवकांना काक्रोच आणि परजीवी म्हटलेले आहे हे आपण इथे लक्षात घेतले पाहिजे

तसेही यांच्या वर्णधर्मानुसार मागासवर्गीय म्हणजे शूद्र . आणि शुद्र हे एकप्रकारे काक्रोच आणि परजीवीच आहेत. ●●

# पेपर लीक, रखडलेले निकाल आणि सत्तेची घातक उदासीनता..

## युवकांच्या भविष्याशी सुरू असलेला संघटित अन्याय

**भारताचा युवक आज दुहेरी संकटात सापडला आहे. एकीकडे पेपर लीक, परीक्षा घोटाळे आणि भरती प्रक्रियेतील भ्रष्टाचार, तर दुसरीकडे निकालातील अमानुष विलंब, वाढती बेरोजगारी आणि प्रशासकीय निष्क्रियता. ही परिस्थिती आता केवळ अपवाद राहिलेली नाही; तर ती व्यवस्थेचाच एक भाग बनत चालली आहे.**

गेल्या दशकात देशभरात ७० पेक्षा अधिक परीक्षा घोटाळ्यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ केला आहे. NEET, SSC, रेल्वे, शिक्षक भरती, पोलीस भरती आणि राज्यसेवा; प्रत्येक स्तरावर परीक्षा प्रणालीवरील विश्वास हादरला आहे. २०१५ मध्ये ऑल इंडिया प्री-मेडिकल टेस्ट (AIPMT) सर्वोच्च न्यायालयाने पेपर लीकमुळे पूर्णपणे रद्द केली. २०१६ मध्ये NEET-II संदर्भात गंभीर आरोप झाले. २०२०–२१ मध्ये 'सॉल्व्हर गँग' (Solver Gang) मॉडेलद्वारे बनावट उमेदवार, बायोमेट्रिक छेडछाड आणि इलेक्ट्रॉनिक गैरव्यवहार उघडकीस आले. २०२४ मध्ये NEET घोटाळ्याने परीक्षा सुरक्षेची संपूर्ण यंत्रणाच उघडी पाडली, जिथे प्रश्नपत्रिका लाखांच्या किमतीत विकल्या गेल्याचे आरोप समोर आले. आता २०२६ मध्येही पुन्हा NEET पेपर लीक झाल्याच्या बातम्यांनी विद्यार्थ्यांचे खच्चीकरण केले आहे. परंतु केवळ पेपर लीकच नव्हे, तर निकालातील विलंबही विद्यार्थ्यांसाठी तितकाच विनाशकारी ठरत आहे. बॉम्बे हायकोर्टातील एका जनहित याचिकेनुसार, नागपूर विद्यापीठाने दिवाळी २०२५ पूर्वी ६०० हून अधिक परीक्षा घेतल्या, मात्र नियमानुसार वेळेत निकाल जाहीर केले नाहीत. सुमारे ७० टक्के निकाल प्रलंबित राहिल्याने विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक प्रवेश, पदवी प्रमाणपत्रे आणि प्लेसमेंट प्रक्रिया गंभीरपणे बाधित झाली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष, करिअर आणि मानसिक स्वास्थ्य व्यवस्थेच्या ढिसाळपणामुळे धोक्यात आले आहे. न्यायालयाला या प्रश्नात हस्तक्षेप करावा लागला, हेच प्रशासनाच्या अपयशाचे सर्वात मोठे प्रमाण आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबातील विद्यार्थी प्रचंड कष्टाने शिकवणी व परीक्षा शुल्क भरतात. अनेक कुटुंबे कर्जबाजारी होतात. तरुण रात्रंदिवस मेहनत करतो, पण शेवटी त्याच्या हाती काय लागते? परीक्षा रद्द, पेपर लीक, रखडलेले निकाल किंवा अनिश्चित भरती प्रक्रिया. प्रश्न अत्यंत स्पष्ट आहे, विद्यार्थ्यांकडून कोट्यवधी रुपये गोळा होतात, पण त्यांना सुरक्षित परीक्षा, वेळेवर निकाल आणि पारदर्शक प्रक्रिया का मिळत नाही? हा केवळ निष्काळजीपणा आहे, की तरुणांच्या असहायतेचा राजकीय आणि प्रशासकीय गैरफायदा घेतला जात आहे? कुठल्याही देशाचा कणा हा तिथला युवा वर्ग असतो आणि भारत हा युवकांचा देश आहे. मात्र, खेदाची बाब अशी की, इथला तरुण आज गंभीर उदासीनतेने ग्रासला आहे. भारतीय युवक सध्या अनेक जटिल समस्यांचा सामना करत आहेत. त्यातील आणखी महत्त्वाची समस्या म्हणजे वाढती शैक्षणिक फी. अनेक महाविद्यालये आणि शिक्षण संस्थांनी लूट सुरू केली आहे, ज्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. परिणामी, एक मोठा वर्ग शिक्षणापासून वंचित राहत आहे. केंद्रीय विद्यापीठांतून २०१८ ते २०२३ दरम्यान साधारण १९,००० OBC, SC आणि ST विद्यार्थ्यांनी 'ड्रॉपआउट' घेतले आहे. याची काही वेगवेगळी कारणे आहेत पण त्यात मुख्यतः ‘वाढीव शैक्षणिक शुल्क’ हे आहे. केंद्रीय शिक्षण राज्यमंत्री सुभाष सरकार यांनी राज्यसभेत ही माहिती लेखी स्वरूपात दिली आहे.



राज रक्षित
मो· ९०२१२९१३९४

आपल्या मूलांच भविष्य पणाला लागल आहे, शिक्षणाच स्वातंत्र्य हिरावल जात आहे. KG to PG शिक्षण पुर्णता निःशुल्क असायला हवे त्या उलट हा गंभीर प्रकार सूरू आहे. दुसरी मोठी समस्या म्हणजे अफाट बेरोजगारी! दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देण्याचे आश्वासन देण्यात आले होते, या आश्वासना ला भाळून तरूणांनी भरभरुन आपली मत ही दिली. परंतु प्रत्यक्षात २ लाख तरुणांनाही नोकऱ्या मिळाल्या नाहीत. केंद्र सरकारच्या माहितीनुसार ९ लाख पदे रिक्त आहेत.

'द प्रिंट' (The Print) च्या वृत्तानुसार, केंद्र आणि राज्ये मिळून देशभरात सुमारे ६० लाख पदे रिक्त आहेत. पण ती भरण्याचे कोणतेही ठोस धोरण सरकारकडे नाही. आज भारत हा 'बेरोजगार तरुणांचा देश' बनत चालला आहे. शैक्षणिक भ्रष्टाचार आणि रोजगाराचे खच्चीकरण यामुळे देशाचे भविष्य नाउमेद झाले आहे. नेत्यांच्या खोट्या घोषणा व भूलथापांमूळे देशातला तरुण आपल्या स्वप्नांचा खून होताना पाहत आहे. आणखी संतापजनक बाब म्हणजे, जेव्हा हा तरुण वर्ग आपल्या हक्कासाठी संविधानिक मार्गाने आवाज उठवतो, तेव्हा सरकार क्रूरतेने त्याचे दमन करते. JNU, अलीगड मुस्लिम विद्यापीठ आणि SSC घोटाळ्याविरोधातील आंदोलनांत विद्यार्थ्यांना झालेली बेदम मारहाण आणि त्यांच्यावर लावलेले खोटे गुन्हे, हे हुकूमशाहीचेच निदर्शक आहे. आता तुम्हाला तुमच्या हक्कांसाठी लढण्याचे स्वातंत्र्यही उरलेले नाही. पायाची आग मस्तकात जाईल अशी आणखी एक गोष्ट म्हणजे स्पर्धा परीक्षा घोटाळा. काही मोजक्या जागा निघतात, त्यासाठी १०००-१२०० रुपये फी असते. गरीब मुले कशीबशी ही रक्कम जमा करतात. एवढा आटापीटा केल्यानंतर परीक्षाच रद्द होते किंवा पेपर फुटतो आणि हे दोनही नाही झाले तर सरकार वर्षो न वर्षो निकाल च जाहीर करत नाही. २० जागांसाठी २० हजार अर्ज येतात, कोट्यवधींचे शुल्क जमा होते, पण पुढे काहीच होत नाही. हा पैसा नक्की जातो कूठे? उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, महाराष्ट्र अशा सर्वच राज्यांत हेच सुरू आहे. एकाही नेत्याला यावर बोलावेसे वाटत नाही. विद्यार्थ्यांची मेहनत आणि पैसा वाया गेल्यामुळे ते मानसिकरीत्या खचत आहेत, ज्यातून तरुण आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. सरकार च्या खासगीकरणाच्या बेअक्कल धोरणामुळे रोजगार आधीच कमी झाले आहेत. खाजगीकरण म्हणजे भांडवालशाही ची पराकाष्ठा! नफा वाढवण्यासाठी कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात कपात केली जात आहे. मग या तरुणांनी जायचे कुठे? या सर्व प्रश्नांच्या गर्तेत यांचे IT सेल एक काम मात्र निष्ठेने करत आहे, ते म्हणजे सोशल मीडियाद्वारे तरुणांची माथी भडकवणे, त्यांचे 'ब्रेनवॉशिंग' आणि ध्रुवीकरण करणे. त्यांना बेरोजगार तरुण हवे आहेत, जे मानसिक गुलाम बनून दंगलीत सहभागी होतील. आजचा तरुण आपल्या भविष्याबाबत जितका चिंताग्रस्त आहे, तितका तो कदाचित कधीच नव्हता.

देशातील नेत्यांनी आता आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहेः

युवांचे भविष्य उद्ध्वस्त करून राष्ट्रनिर्माण शक्य आहे का?
परीक्षा आणि शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचारावर मौन का?
रोजगाराशिवाय विकासाची भाषा किती काळ चालणार?
विद्यार्थ्यांना न्याय मागितल्यावर ददपशाही का?

युवकांना आता केवळ आश्वासने नकोत, तर उत्तरदायित्व हवे आहे. त्यांना पारदर्शक परीक्षा, वेळेवर निकाल, रोजगार आणि त्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई हवी आहे. कारण युवकांचे भविष्य वाचले, तरच देशाचे भविष्य वाचेल.●●

# राष्ट्रीय जनगणना–2026 मधील महाराष्ट्रातील बौद्धांची भूमिका

यामुळे कुठल्याही बौद्धांची अस्मिता धोक्यात येत नाही. असे केल्याने कोणतीही बौद्ध व्यक्ती हिंदू बनत नाही. तुमची स्वतंत्र बौद्ध ही ओळख कायम राहते. बौद्धांनी स्वतः अल्पसंख्यांक म्हणून घेवू नव्हे. तसे करणे म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या 'सारा भारत मी बौद्धमय (बहुसंख्यांक) करेन' या प्रतिज्ञेचा भंग होतो. अल्पसंख्यांकासाठी संविधानात कलम 29 ते 30 मधून तरतूदी आहेत. बौद्ध अल्पसंख्यांक म्हणून संविधानात कुठलीही तरतूद नाही. तेंव्हा उगीचच समाजात वर्गीकरण करू नये व संभ्रम पसरवू नये. आपल्या योग्य निर्णयावरच तुमची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती अवलंबून आहे. तेंव्हा आपण योग्य तो निर्णय घ्यावा.

काही आंबेडकराईट लोकांचे म्हणणे असे आहे की, जनगणना कायदा 1948, कलम 15 नुसार जनगणनेतील माहिती ही गोपनिय असते व ती पुरावा म्हणून कोर्टाच्या खटल्यात वापरता येत नाही. तेंव्हा जनगणनेत दिलेल्या माहितीचा 'Atrocity Act' अंतर्गत गुन्हयासाठी काहीही अपयोग नाही. हि बाब ज्युडिशियल क्षेत्रातील खटल्यासाठी लागु पडणारी असते. तिचा देशाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासाठीच्या नियोजनासाठी, प्रत्येक घटकांना किती तरतूद असावी यासाठी याच जनगणनेच्या आकडेवारीचाच उपयोग आतापर्यंत करण्यात आला व पुढेही हीच आकडेवारी संपूर्ण क्षेत्रातील विकास नियोजनात वापरण्यात येणार आहे. ॲट्रॉसिटी ॲक्ट गुन्हा नोंदणीसाठी प्रथम अट असते ती म्हणजे तक्रारदार व्यक्ती ही अनुसूचित जातीची असावी. म्हणजेच अनुसूचित जातीचा संबंध ॲट्रॉसिटीच्या ॲक्ट मधील गुन्हा निश्चितीसाठी आहे व हि अनुसुचित जात जनगणना तसेच संविधानाचे कलम 341 नुसार निश्चित होते व 341 मधील अनुसूचित जातीची संख्या ही जनगणनेतील संख्येवर आधारीत असते. म्हणून जनगणनेत जातीचा उल्लेख अनुसूचित जात व तीअंतर्गत पोटजात करणे आवश्यक असते. चुकीच्या पद्धतीने अर्थ लावून अगोदरच भ्रमित असणाऱ्या बौद्ध जनतेला जास्त भ्रमित करू नये. काही बुद्धीजिवी लोकांनी सुद्धा डॉ. बाबासाहेबांच्या नातवंडावर आपला रोष व्यक्त केलेला आहे. इथे डॉ. बाबासाहेबांचे नातवंड किंवा समाजाचे अधिकारी आपली मते व्यक्त करतात, हा महत्वाचा मुद्दा नाही. ते योग्य मार्गदर्शन करतात किंवा कसे हे जास्त महत्वाचे आहे. याला त्याला दोष देत बसण्यापेक्षा संपूर्ण देशव्यापी धर्मांतराची मोहिम या पांढरपेशा वर्गाने सुरू करावी, पण त्यातही आता उशिर झालाच आहे कारण जवळपास 12 राज्यांतून धर्मांतरविरोधी कायदा लागु झालेला आहे व आता अलिकडे महाराष्ट्रातही तो कायदा लागु होणार आहे. आता धर्मांतराच्या रस्त्यांत मोठी अडचण येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील फक्त 65 लाख बौद्धांच्या लोकसंखेवर आम्हाला समाधान मानणे भाग पडणार आहे. सारा भारत बौद्धमय करेन ही भिमगर्जना आता हवेत विरून जाण्याची शक्यता आहे. यासाठी आम्ही 90 टक्के राजकारणी झालोत व फक्त 10 टक्के धर्मकारणी झालोत या चुकीच्या भूमिकेमुळे आज आमची पतनाकडे वाटचाल सुरू आहे. भारतिय बौद्ध महासभेने संपूर्ण देशभर जागृती करून अनुसूचित जातींना धर्माच्या रकान्यात बौद्ध लिहिण्यासाठी प्रवृत्त केले तर थोड्या प्रमाणात डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेला आम्ही न्याय देवू शकू व भारतात बौद्धांची टक्केवारी वाढविण्यास हातभार लागू शकतो. हे काम करण्याची प्रत्येक बौद्धांना, संघटनांना व त्यांच्या म्होरक्यांना सद्बुद्धी लाभो हिश आशा. 'बहुजन सौरभ' मधील एक लेख 'बौद्ध अनुसुचित जाती आणि अल्पसंख्यही' या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेला आहे. या लेखातून लेखकाने बौद्ध अल्पसंख्यांक योजना व बौद्ध अनुसुचित जाती या दोन्हीचे लाभ बौद्धांनी घ्यावेत असे म्हटले आहे. बौद्धमध्ये यामुळे वर्गीकरण करणेसाठी वाव मिळतो. तेंव्हा बौद्धांनी अल्पसंख्यांक म्हणवून घेवु नये. संपूर्ण 15 टक्के केंद्र तसेच 13 टक्के महाराष्ट्रात अनुसूचित जातींचा लाभ बौद्धांनी घ्यावा. त्यात विभाजन करू नये. काँग्रेसच्या काळात असे बौद्ध आणि अल्पसंख्यांक बौद्ध असा भेद करण्यासाठी जाणीवपूर्वक काही सवलती अल्पसंख्यांक बौद्धांना देणारे आदेश केंद्र सरकारने काढले होते. अल्पसंख्यांक बौद्धांना संविधानात्मक दर्जा प्राप्त नाही, व त्यामुळे त्यांनी अश्या प्रलोभनास बळी पडू नये. आपली ओळख बौद्ध (अनुसूचित जातीमधून धर्मांतरीत) अशीच कायम ठेवावी. 'सारा भारत बौद्धमय करणे' या डॉ. बाबासाहेबांच्या प्रतिज्ञेत बौद्धांना बहुसंख्यांक बनविण्याचे ध्येय होते. त्यांना अल्पसंख्यांक बनविण्यासाठी त्यांनी ही घोषणा केली नव्हती हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या नालायकपणामुळे आपण राजकारणाच्या जास्त नादी लागलो व त्यांच्या बौद्ध भारताकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे महाराष्ट्र वगळता संपूर्ण देशात आपण बौद्धांची संख्या वाढवू शकलो नाही. संपूर्ण देशात केवळ 77 लाख बौद्धांची लोकसंख्या आहे. त्यातील एकट्या महाराष्ट्रात 65 लाख बौद्धांची संख्या आहे. आहे. धर्मांतरीत बौद्धांच्या निष्क्रियतेची यातून जाणीव होते. आपण बुद्धाला वगळून चळवळी करीत राहिलो. त्याचाच हा परिणाम होय. सद्याही बुद्धाला वगळूनच आपण 'फूले शाहू आंबेडकर' असे घोषवाक्य स्विकारले आहे. आपले घोषवाक्य बौद्ध भारत निर्मितीसाठी 'बुद्ध अशोक आंबेडकर' असे राबविणे गरजेचे आहे. चुकीच्या मांडणीमुळे आपण प्रतिक्रांतीवाद्यांना सत्तेत नेवून पोहोचविले व डॉ. बाबासाहेबांच्या बौद्ध भारत निर्मितीस सुरूंग लावण्याचे काम केले. महाराष्ट्रात धर्मांतरित बौद्धांसाठी 6 जूलै 1960 च्या परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले की, केवळ धर्म बदलला म्हणून जातीची सामाजिक व शैक्षणिक स्थिती बदलत नाही. त्यामुळे धर्मांतरित बौद्धांना अनुसुचित जातीच्या सर्व सवलती लागु राहतील, असे आदेश दिले. धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र मिळणेसाठी 1 आक्टोबर 1962 ला परिपत्रक काढून जातीच्या प्रमाणपत्राचा नमुना प्रकाशित केला. या नमुन्यातील जातीच्या प्रमाणपत्रानूसार धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळून ते सवलतीस पात्र ठरतात. ही तरतुद फक्त महाराष्ट्रातील धर्मांतरित बौद्धांना लागु होणेसाठी 'धर्मांतरित बौद्ध' हा अनुसूचित जातीचा एक समुह आहे, तो जात नाही. व म्हणून त्याचा समावेश संविधानाच्या कलम 341 मध्ये जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत या महाराष्ट्रातील व देशातील धर्मांतरीत बौद्धांना अनुसूचित जातीचे लाभ मिळण्यास ते पात्र ठरत नाही. जून 1990 ला राष्ट्रपतीचा संविधान आदेश 1990 ला घटनात्मक दुरूस्ती करून (कायदा 97) बनविण्यात आला व दुरूस्तीनुसार आता देशातील अनुसूचित जातीमधून बौद्ध धर्मात धर्मांतरित होणाऱ्या जातींना या अनुसूचित जातीचे संविधानात्मक लाभ मिळण्यास ते पात्र ठरलेले आहेत. पण केंद्र सरकारने अद्यापपर्यंत या संबंधीचा आदेश पारित केलाच नाही. त्यासाठी आंबेडकराईट चळवळीने कोणताही प्रयास केलेला नाही. त्यामुळे केंद्र सरकारच्या नोकऱ्यात अजूनही धर्मांतरित बौद्धांना आरक्षण मिळत नाही. यामुळे संपूर्ण देशातून अनुसूचित जातीमधून बौद्ध धर्मात धर्मांतराची लाट निर्माण होवु शकली नाही. यासाठी महाराष्ट्रातील धर्मांतरीत बौद्धांच्या संघटना, संघटनांचे नेतृत्व, साहित्यिक तसेच बुद्धीजिवी विचारवंत यांचेद्वारे पुरेसे प्रयत्न झालेले नाहीत. अनिल वैद्य म्हणतात त्याप्रमाणे 'धर्मांतरित बौद्ध' ही जात नसून तो अनुसुचित जातीमधील एक समुह होय, हे खरे आहे. हाच आधार संविधानाच्या कलम 341 नुसार घेवून त्यांचा समावेश अनुसूचित जातीच्या यादीमध्ये करवुन घेणे गरजेचे आहे. कलम 341 च्या तरतुदीनुसार राष्ट्रपतीला जाहिर अधिसूचनेद्वारे त्या राज्याच्या संबंधात या संविधानाच्या प्रयोजनार्थ, अनुसूचित जाती म्हणून मानल्या जातील त्या जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यातील गट (समुह) विनिर्दिष्ट करता येतील. 'धर्मांतरित बौद्ध' हा अनुसूचित जातीमधील एक गट किंवा समुह आहे व म्हणून त्याचा समावेश या कलम 341 मध्ये करता येतो. यासाठी विशेष असे प्रयत्न करणे आवश्यक ठरते. 'धर्मांतरित बौद्ध' हा समुह म्हणून संविधानाच्या कलम 341 मध्ये समाविष्ट होत नाही तोपर्यंत त्यांना संविधानात्मक सुरक्षा प्राप्त होवू शकत नाही. असे झाले तर महाराष्ट्रासह संपूर्ण देशात धर्मांतरित बौद्धांना अनुसूचित जातीचे संविधानात्मक लाभ मिळण्यास ते पात्र ठरतील. महाराष्ट्रातील सुजाण बौद्धांनी यासाठी पुढाकार घ्यावा अशी अपेक्षा. सद्यःपरिस्थितीत मात्र येणाऱ्या जनगणनेत जातीच्या रकान्यात जातीचा उल्लेख करावा व धर्माच्या रकान्यात 'बौद्ध' धर्माचा उल्लेख करणेच योग्य ठरते.●●






डॉ. एन.व्ही. ढोके
मो.9423677725

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प -151

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा गोळा (कोळसा) देवळी वर्धा



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा गौळा, देवळी तालुका जिल्हा वर्धा येथिल आहे. या परिसरातील लोक मोठ्या प्रमाणावर येथे एकत्र येऊन दिनविशेष कार्यक्रम येथे नित्यनेमाने साजरे करतात. वर्धा जिल्ह्यातील महत्वाचा तालुका म्हणून देवळी तालुक्याची ओळख आहे. अनुसूचित जाती करिता हा राखीव विधानसभा मतदारसंघ आहे.

संवाद मित्र, राजू थुल
मो. 9423420031

# बौद्ध इतिहास-संस्कृती जपणाऱ्या कार्याचा गौरव

## आर्य नागार्जुन संग्रहालयाचा रौप्य महोत्सवी सोहळ्यात

**पुणे :** बौद्ध इतिहास आणि संस्कृती संशोधन संस्था अंतर्गत कार्यरत असलेल्या प्रसिद्ध 'आर्य नागार्जुन संग्रहालया'च्या रौप्य महोत्सवी वर्ष सोहळ्याचा कार्यक्रम रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला. आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनाचे औचित्य साधून आयोजित या विशेष कार्यक्रमात संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत योगदान देणाऱ्या विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा विशेष सत्कार करण्यात आला. ९ एप्रिल २००० रोजी स्थापन झालेल्या या संग्रहालयाच्या २५ वर्षांच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच हे समृद्ध संग्रहालय उभारण्यासाठी आयुष्य वेचणारे कळकळीचे संग्राहक दिलीप लक्ष्मण वानखेडे यांच्या कार्यावर विशेष प्रकाश टाकण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते, पाली भाषेचे वरिष्ठ अभ्यासक, लिपीतज्ञ व लेणी संवर्धक अतुल भोसेकर यांनी 'बौद्ध संग्रहालयाची वैश्विकता' या विषयावर विशेष व्याख्यान दिले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी व पुणे महानगरपालिका चे उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी संग्रहालयाच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. संग्रहालयाच्या पुढील विस्तारासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सध्याच्या जागतिक युद्धजन्य परिस्थितीवर भाष्य



करताना ते म्हणाले, "आज जगभर निर्माण झालेले युद्धाचे सावट दूर करण्यासाठी महात्मा गौतम बुद्ध यांचे शांतता, करुणा आणि बंधुभावाचे विचारच मार्गदर्शक ठरू शकतात." कार्यक्रमाचे अध्यक्ष व महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव बाळासाहेब सावंत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून स्मृतीशेष दिलीप वानखेडे यांच्या दुर्मिळ ऐतिहासिक संग्रहाचे कौतुक केले. एवढा मोठा सांस्कृतिक वारसा जतन करणे हे अत्यंत प्रेरणादायी कार्य असल्याचे सांगत त्यांनी संग्रहालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शन भंते नाग दीपंकर महास्थवीर यांनी केले. बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संग्रहालयाच्या अध्यक्षा कल्पना दिलीप वानखेडे यांनी प्रस्तावना व आभार प्रदर्शन केले, तर संचालन दीपक मस्के यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन कुलदीप वानखेडे आणि हर्षवर्धन वानखेडे यांनी केले. या प्रसंगी स्त्री भूषण रमाई आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष विठ्ठलराव गायकवाड, पुणे मनपाचे नगरसेवक निलेश आल्हाट, वसुंधरा भोसेकर यांच्यासह सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वणवा पीडितांना तातडीने मदत करा

## ऑल इंडिया समता सैनिक दलाचे निवेदन



**भिवापूर :** भिवापूर तालुक्यातील धामणगाव (विद्यामंदिर) या ग्रामीण भागात अलीकडेच लागलेल्या भीषण वनव्यामुळे गावातील अनेक कुटुंबाची घरे पूर्णतः जळाल्यामुळे पीडित कुटुंबाच्या निवाऱ्याचा गंभीर प्रश्न उपस्थित झालेला आहे. आगामी काही दिवसात वादळ व मुसळधार पाऊस येण्याची शक्यता असल्यामुळे हा पीडित कुटुंबांची आहे त्यापेक्षा अधिक दयनीय अवस्था होईल. याकडे विशेष लक्ष देण्यासाठी ऑल इंडिया समता सैनिक दलाच्या भिवापूर शाखेतर्फे भिवापूर तहसीलदारांना व त्यांच्या माध्यमातून जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन देण्यात आले. सदरची घटना ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत आपत्ती या श्रेणीत मोडत असल्यामुळे व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१ नुसार या नागरिकांना जीवनाचा व सुरक्षिततेचा हक्क हा त्यांचा मूलभूत अधिकार असल्यामुळे स्थानिक व जिल्हा प्रशासनाने या अग्निपिडीत कुटुंबांना तातडीने तात्पुरत्या सुरक्षित निवाऱ्याची सोय करून द्यावी, अन्न, पिण्याचे पाणी, कपडे व इतर आवश्यक वस्तूंचा त्वरित पुरवठा करावा, नुकसानग्रस्त कुटुंबाचे तत्काळ पंचनामे करून अहवाल सादर करावा, शासनाच्या आपत्ती मदत निधीतून तातडीने आर्थिक मदत करावी, त्या कुटुंबाचे कायमस्वरूपी पुनर्वसन करून त्यांना लवकर घरे बांधून देण्यात यावी, आरोग्य पथक व आपातकालीन सेवा तातडीने तैनात करण्यात यावी अश्या मागण्या या निवेदनातून करण्यात आल्या. यावर तातडीने कार्यवाही न झाल्यास कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्यात येईल असेही या निवेदनातून सांगण्यात आले. हे निवेदन देताना ऑल इंडिया समता सैनिक दलाच्या तालुका अध्यक्षा संगीता गोवर्धन, सचिव लता बनकर, सूर्यकांता गेडाम, अर्चना मोटघरे, विनिता बनकर आदी समता सैनिक उपस्थित होते.

## महत्वाचे

### न्यायालयाचा अवमान आणि लोकशाही मूल्यांच्या अपमानाविरोधात राज्यपालांकडे AIMIM ची मागणी

**नागपूर :** ऑल इंडिया मजलिस -ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM) पक्षाच्या वतीने महाराष्ट्राचे राज्यपाल यांना निवेदन देत दोन गंभीर प्रकरणांत कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, संभाजीनगर येथील नगरसेवक मतीन पटेल प्रकरणात महानगरपालिका आयुक्तांनी न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन करत मुदतीपूर्वीच बुलडोझर कारवाई केली. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने ही कारवाई बेकायदेशीर ठरवली आहे. यापूर्वी नागपूरमधील फहीम खान प्रकरणातही न्यायालयाने नागपूर महानगरपालिका आयुक्तांना दोषी ठरवले होते. वरिष्ठ आयएएस अधिकारीच न्यायालयीन आदेशांचे पालन करत नसतील, तर सामान्य नागरिकांमध्ये न्यायव्यवस्था आणि कायद्याबाबत चुकीचा संदेश जाईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासोबतच, राज्य सरकारमधील मंत्री नितेश राणे यांनी AIMIM पक्षाला दहशतवादी संघटना संबोधल्याचा आणि खासदार असदुद्दीन ओवैसी यांची तुलना "लादेन"शी केल्याचा निषेधही व्यक्त करण्यात आला आहे. निवेदनात म्हटले आहे की, AIMIM हा भारत निवडणूक आयोगाकडे नोंदणीकृत राजकीय पक्ष असून त्यांचे नगरसेवक, आमदार आणि खासदार लोकशाही प्रक्रियेतून निवडून आले आहेत. अशा पक्षाला दहशतवादी संघटना म्हणणे म्हणजे त्या पक्षासह लोकशाही, निवडणूक आयोग आणि जनतेने निवडून दिलेल्या प्रतिनिधींचाही

### गॅस-डिझेल वितरणात गोंधळ खपवून घेतला जाणार नाही : पालकमंत्री

**नागपूर :** कोणत्याही जीवनावश्यक वितरण प्रणालीमधील पारदर्शकता ही ग्राहकांचा विश्वास वृद्धिंगत करत असते. मात्र, हे साधे सूत्र गॅस कंपन्या, गॅस एजन्सी, पेट्रोलियम कंपन्या आणि पेट्रोलपंप चालकांकडून सर्रास धाब्यावर बसवले जात असल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे.या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल आणि इतर कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची कानउघाडणी करत त्यांना धारेवर धरले.शासनाने या वितरण व्यवस्थेत वेळोवेळी सुधारणा केली, जिल्हाधिकाऱ्यांनी आढावा बैठका घेऊन स्पष्ट निर्देश दिले; एवढे सगळे होऊनही ग्राहकांना वेळेवर एक साधा 'मेसेज' पोहोचवण्याची जबाबदारी कंपन्या का पार पाडत नाहीत, असा सवाल पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना केला. ग्राहकांना वेळेवर गॅस मिळावा आणि वितरणातील सर्व त्रुटी तत्काळ दूर व्हाव्यात, यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते अत्यंत आक्रमक भूमिकेत पाहायला मिळाले. या बैठकीला वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, जिल्हा दक्षता समितीचे सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### नागपूर महापालिकेतील अर्थसंकल्प सादर न होताच सभा तहकूब

**नागपूर :** गेल्या दोन महिन्यांपासून महापालिकेच्या स्थायी समिती सभापती शिवाणी दानी यांनी अर्थसंकल्पासाठी तयार केली. नागरिकांकडून मते मागवून त्यांनी अनेक नवीन योजना, उत्पन्न वाढीचे स्त्रोतासह विकास कामांचा अर्थसंकल्पात समावेश केला. परंतु आज मंगळवारी महापालिकेच्या विशेष सभेत स्थायी समिती सभापती शिवानी दाणी यांना अर्थसंकल्प सादर करता आला नाही. रेशीमबाग येथील सुरेश भट सभागृहात अर्थसंकल्प सादर करण्यासाठी आज विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. परंतु सभा सुरू होताच महापौर निता ठाकरे यांनी ती तहकूब केली. त्यामुळे आता तयार केलेला अर्थसंकल्प सभागृहात सादर होण्यापूर्वीच फुटणार नाही, याची काळजी सत्ताधाऱ्यांना घ्यावी लागणार आहे. सभागृह तहकूब करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीची आचारसंहिता कारणीभूत ठरली. काल, सोमवारी निवडणूक आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक जाहीर केल्यानंतर आचारसंहिताही लागू झाली. त्यामुळे स्थायी समिती सभापतींपुढे अर्थसंकल्प सभागृहात मांडण्याबाबत मोठा पेच निर्माण झाला.

### भंडाऱ्यात युवकाची निर्घृण हत्या

**भंडारा :** शहरातील संत जगनाडे चौक अर्थात शुक्रवारी चौक परिसर सोमवारी मध्यरात्री रक्तरंजित हत्याकांडाने हादरून गेला. रजत विलास लिमजे (३०) उर्फ "व्हाईटनर" या युवकाची धारदार शस्त्राने निर्घृण हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. रात्री सुमारे ११.२० वाजताच्या सुमारास घडलेल्या या थरारक प्रकारामुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, घटनेनंतर भंडारा पोलिसांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे अवघ्या पाच तासांत मुख्य आरोपीला अटक करण्यात यश आले आहे. मृतक रजत लिमजे हा महिला समाजाच्या मागील परिसरातील रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे. तो शास्त्री चौकातील एक बारमध्ये काम करतो. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तात्काळ पोलिसांना माहिती दिली. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या रजतला उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. या घटनेनंतर शहरात भीती आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते.

# उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीकडून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांना निवेदन



**नाशिक :** आरक्षण उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समिती, नाशिक जिल्हाच्या वतीने दि. 18 मे 2026 रोजी नाशिक येथील हॉटेल एक्सप्रेस इन येथे शिवसेना उपनेते तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथराव शिंदे यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणास तीव्र विरोध असल्याचे ठामपणे सांगितले. तसेच न्या. अनंत बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करण्यात यावा आणि अनुसूचित जातींचे आरक्षण अबाधित ठेवण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित भारतीय संविधानाने दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्वांना तडा जाईल असे कोणतेही निर्णय सरकारने घेऊ नयेत. अन्यथा आंबेडकरी समाज रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करेल, असा इशाराही समितीच्या वतीने देण्यात आला.

या प्रसंगी समितीचे अध्यक्ष प्रकाश पगारे, समितीचे मुख्य मार्गदर्शक न्यायाधीश अनिल वैद्य, कार्याध्यक्ष सनी रोकडे, महिला आघाडी प्रमुख लक्ष्मी ताठे, डॉ. प्रवीण गांगुर्डे, मिलिंद हाटे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# सप्तखंजरी वादक कीर्तनकार सत्यपाल महाराज यांचा जन्मदिनी प्रबोधन दिन साजरा



**नागपूर :** येथील कविवर्य सुरेश भट सभागृह येथे प्रबोधन दिनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. सप्तखंजरी वादक कीर्तनकार सत्यपाल महाराज यांच्या जन्मदिनानिमित्त हा दिवस "प्रबोधन दिन" म्हणून दरवर्षी साजरा केला जातो.

यावेळी समाजप्रबोधनासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रदान करण्यात येणारा "समाज प्रबोधन पुरस्कार" यावर्षी व्यसनमुक्ती क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल व्यसनमुक्ती सम्राट मधुकर खोडे महाराज यांना नागपूर शहराचे खासदार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे हस्ते प्रदान केला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी संबोधन करतांना म्हणाले, युवापिढीतील विविध आरोग्याला धोकादायक व्यसनाधिनता राष्ट्रासाठी चिंतनाचा विषय आहे. निर्भर युवाभारत हाच राष्ट्रप्रगतीचा खरा सेतू आहे. सत्यपाल महाराज आणि सत्कारमूर्ति मधुकर खोडे महाराज यांचे व्यसनमुक्त युवा घडविण्यासाठीच प्रबोधनकार्य महान आहे. आपले उपकार राष्ट्र विसरणार नाही असे प्रतिपादन यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते, माजी आमदार व वनराईचे विश्वस्थ गिरीश गांधी हे होते.

यावेळी महापौर निता ठाकरे, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार प्रवीण दटके, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, राजे जयसिंह महाराज भोसले, डॉ. सय्यद रफीक पारनेरकर, आचार्य हरिभाऊ वेरुळकर, रवी मानव - व्याख्याते व संचालक, अध्यात्म गुरुकुल, नितीन सरदार - दीनबंधु सेवा संस्था, भदंत संघरत्न माणके, ज्ञानेश्वर रक्षक तसेच इंजि. भाऊसाहेब थुटे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच महाराष्ट्रातील सर्व सप्तखंजरीवादक प्रबोधनकार उपस्थित होते.

कार्यक्रमाचे तुषार सूर्यवंशी - सप्तखंजरीवादक प्रबोधनकार यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन व आयोजन केले होते. तसेच नितीन सूर्यवंशी व संपूर्ण सूर्यवंशी परिवाराने तन, मन आणि धनाने योगदान देत कार्यक्रम यशस्वी केला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आकाश टाले व हरीश पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# विद्यार्थ्यांनी मिळविले पैकीच्या पैकी गुण



नागपूर : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने (एमएसबीएसएचएसई) 10वी बोर्ड परीक्षेचे निकाल जाहीर केले. पीडब्ल्यूच्या उडान 2026 (इयत्ता 10 वी) महाराष्ट्र बॅच मधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले असून सात विद्यार्थ्यांनी परफेक्ट 500/500 गुण मिळवले असल्याची माहिती पीडब्ल्यूतर्फे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. 500/500 गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अर्पिता दत्ता वाडकर, ओंकार कल्याण राठोड, मृण्मयी संतोष वैकार, रुद्र अभय उत्पट, शिवम दत्तात्रय चाटे, स्नेहा चक्रधर कर्भारी आणि सूरज अंकुश बडे यांचा समावेश आहे.

याशिवाय, 25+ विद्यार्थ्यांनी 99% आणि त्यापेक्षा जास्त गुण मिळवले, 55+ विद्यार्थ्यांनी 98% पेक्षा जास्त, 98+ विद्यार्थ्यांनी 97% पेक्षा जास्त, 156+ विद्यार्थ्यांनी 96% पेक्षा जास्त, 254+ विद्यार्थ्यांनी 95% पेक्षा जास्त आणि 936+ विद्यार्थ्यांनी 90% पेक्षा जास्त गुण मिळवले. गणित विषयात 27 विद्यार्थ्यांनी 100/100 तर विज्ञान विषयात 9 विद्यार्थ्यांनी 100/100 गुण मिळवले. विद्यार्थ्यांच्या या कामगिरीवर प्रतिक्रिया देताना पीडब्ल्यूचे संस्थापक आणि शिक्षक आलख पांडे म्हणाले, "महाराष्ट्र बोर्ड परीक्षेत आमच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या कामगिरीचा आम्हाला अत्यंत अभिमान आहे. हे निकाल विद्यार्थ्यांचे, पालकांचे आणि शिक्षकांचे एकत्रित परिश्रम दर्शवतात. पीडब्ल्यू मध्ये आमचे लक्ष शिक्षण सर्वांसाठी उपलब्ध करून देणे आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात सातत्याने साथ देणे यावर आहे."

# ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त सहा दिवसीय धम्मसंस्कार शिबिर



**नागपूर :** लहान मुला-मुलींच्या मनावर धार्मिकतेचे व नैतिकतेचे संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने शिवशक्ती नगर परिसरातील शुद्ध चित्त बुद्ध विहार येथे ज्येष्ठ पौर्णिमेनिमित्त सहा दिवसीय धम्मसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर २५ मे ते ३० मे २०२६ दरम्यान दररोज सकाळी ७ ते १०.३० या वेळेत पार पडणार आहे.

भगवान बुद्धांच्या धम्मपदातील "न तं माता पिता कयिरा..." या वचनाचा आधार घेत, मुलांच्या मनात धम्म, शिस्त, करुणा आणि नैतिक मूल्यांची जडणघडण व्हावी या हेतूने पूज्य भिक्खू संघाच्या माध्यमातून हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. शिबिरात ११ ते १८ वयोगटातील मुला-मुलींना सहभागी होता येणार आहे.

हे शिबिर मानेवाडा रिंग रोड येथील तपस्या विद्या मंदिरच्या मागे असलेल्या शुद्ध चित्त बुद्ध विहार येथे आयोजित करण्यात आले असून, इच्छुक विद्यार्थ्यांच्या पालकांनी नोंदणी करणे आवश्यक आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी १०० रुपये नोंदणी शुल्क ठेवण्यात आले असून मर्यादित जागा उपलब्ध आहेत.

नोंदणीसाठी विद्यार्थ्यांचे नाव व वय ७९७२४५८५२८ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावे, असे आयोजकांनी कळविले आहे. अधिक माहितीसाठी भिक्खू संघरतन शाक्य (९१४५७६३७४४), भंते दिपंकर बोधी (९३०७४८५८१५) व भंते बोधी प्रिय (७२१८८२५८०५) यांच्याशी संपर्क साधावा.

शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी वही व नोटबुक सोबत आणणे आवश्यक असून, मुलांना शिबिरात आणणे व परत घेऊन जाण्याची जबाबदारी पालकांची राहणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे.

# सर्वव्यापक समानता निर्माण होण्यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण गरजेचे : प्रा. डॉ. बी.एस. वाघमारे

## आरक्षण उपवर्गीकरणासाठी विदर्भातील मातंग समाजाची भूमिका ठाम



**नागपूर :** सम्राट प्रसेनजीत सामाजिक संस्था, मातंग समाज संघटना नागपूर आणि मुक्ता साळवे विचार मंच यांच्या संयुक्त विद्यमाने "अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण" या विषयावर एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन रविवारी आमदार निवास सभागृह, नागपूर येथे करण्यात आले. या चर्चासत्रात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ. बी.एस. वाघमारे यांनी सांगितले की, "अनुसूचित जातीतील प्रत्येक जातीला सामाजिक भेदभाव समान स्वरूपात सहन करावा लागतो. मात्र शैक्षणिक आणि आर्थिक स्थितीमध्ये मोठी विषमता आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारी सर्वव्यापक समानता निर्माण करण्यासाठी आरक्षणाचे उपवर्गीकरण होणे आवश्यक आहे." ते पुढे म्हणाले की, आरक्षण उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाने पंजाब राज्य विरुद्ध देविंदरसिंग प्रकरणात १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेला ऐतिहासिक निर्णय अभ्यासला पाहिजे. त्या निर्णयामध्ये उपवर्गीकरणाची आवश्यकता, त्यासाठीचे निकष आणि सामाजिक न्यायाची कारणमीमांसा स्पष्टपणे मांडण्यात आली आहे. हरियाणा राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही उपवर्गीकरण लागू झाल्यास मातंग समाजासह इतर वंचित घटकांना आरक्षणाचा लाभ प्रभावीपणे मिळू शकेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राहुल नरंगळकर यांनी प्रास्ताविक केले, तर अंकुश गोतावळे यांनी विषयाची सविस्तर भूमिका मांडली. परिमल कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले.

या चर्चासत्रात विदर्भातील मातंग समाजातील अनेक बुद्धिजीवी, अभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला. यामध्ये प्रा. बबन इंगोले, ॲड. बी.एच. खडसे (अमरावती), राजू येले (चंद्रपूर), राकेश डोके (भंडारा), किशोर खंडाळे, मनोहर खंडाळे, बुधाजी सुरकार, प्रा. राहुल हिवराडे, अंकुश बावणे, रमेश पाडण, रवींद्र खडसे, संजय पोटफोडे, डॉ. चंदा वानखेडे, वेदकुमार तायवाडे, प्रकाश तायवाडे, डी. के. सरनाईक, आर. के. वानखेडे, विजय इंगळे, शंकरराव ठोसर, संजय ठोसर, पंजाबराव कावळे, शंकरराव काळे, विनोद लोखंडे, कैलास पोटफोडे, कैलास काळे, नामदेव डोंगरे, देवानंद वानखेडे, कृष्णा कामडे, ॲड. संतोष चव्हाण, सुभाष खंडाळ, वसंत गवळी (गोंदिया), राजेश वानखेडे, संतोष नृपनारायण आदींचा समावेश होता.

संचालन रामचंद्र दावलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन फकिरा खडसे यांनी केले. या चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी शंकरराव वानखेडे, अरविंद डोंगरे, गोपाळ वानखेडे, मनीष अडागळे, शंकर गौरकर, राजेश गायकवाड, सुजीत सनेश्वर आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# वर्ल्ड हायपरटेन्शन दिनानिमित्त वैशाली नगर येथे मोफत आरोग्य तपासणी




**नागपूर :** लिट फाऊंडेशन यांच्या वतीने वर्ल्ड हायपरटेन्शन दिनानिमित्त रविवार दि. 17 मे 2026 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, वैशाली नगर, नागपूर येथे मोफत बी.पी. व शुगर तपासणी स्वास्थ्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सुमारे 150 नागरिकांनी सहभाग नोंदवून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या उपक्रमास तांदळे रिसोर्स अँड डेवलोपमेंट सोसायटी तसेच सुजाता बुद्ध विहार कमिटी यांचे सहकार्य लाभले. आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विनय वाघमारे, मंजुषा वाघमारे, आकाश खोब्रागडे, दिलीप तांदळे, अशोक रामटेके, राजेश Ramटेके, प्रीती गजभिये व धनमाला गोंडाने यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल आयोजकांनी सर्व सहकार्यकर्ते व उपस्थित नागरिकांचे आभार मानले.

# समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षानिमित्त महत्त्वपूर्ण सर्वसाधारण सभा २४ मे रोजी भंडाऱ्यात

**नागपूर :** समता सैनिक दल या संघटनेच्या स्थापनेला १९ मार्च २०२७ रोजी १०० वर्षे पूर्ण होत असून, त्यानिमित्त देशभरात शताब्दी वर्ष विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर समता सैनिक दलाच्या केंद्रीय कार्यकारिणी समितीच्या वतीने महत्त्वपूर्ण सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

ही सभा रविवार, दि. २४ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जनचेतना मूकबधिर शाळा, भंडारा-नागपूर रोड, भंडारा येथे आयोजित करण्यात आली आहे. सभेच्या अध्यक्षस्थानी समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे राहणार असून प्रमुख उपस्थितीत मुख्य सल्लागार परमपूज्य भदंत नाग दिपांकर, राष्ट्रीय जीओसी डॉ. प्रदीप डोंगरे तसेच राष्ट्रीय महासचिव एम. आर. राऊत उपस्थित राहणार आहेत. या सभेमध्ये शताब्दी वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांची रूपरेषा, जनगणना जनजागृती मोहीम, अनुसूचित जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाचा विषय, तसेच विविध जिल्हास्तरीय जीओसींचा सार्वजनिक सत्कार आदी महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली. समता सैनिक दलाच्या केंद्रीय समितीतील सर्व पदाधिकारी, राज्य, विभाग, जिल्हा, तहसील आणि शहरस्तरीय समित्यांचे अधिकारी व सदस्य यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सभा यशस्वी करावी, असे आवाहन राष्ट्रीय अतिरिक्त महासचिव अमर दिपांकर यांनी केले आहे. "शील ! शौर्य ! बलिदान !" या ब्रीदवाक्यासह कार्यरत असलेल्या समता सैनिक दलाच्या शताब्दी वर्षाच्या तयारीकडे समाजातील विविध घटकांचे लक्ष लागले आहे.

SAMATA SAINIK DAL
समता सैनिक दल

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648